

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




# ई मासिक विद्यासंवाद

फेब्रुवारी २०२४ | आवृत्ती-०८



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु म्हणून डॉ. प्रशान्त बोकारे यांनी स्वीकारला पदभार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून डॉ. प्रशांत बोकारे यांनी बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी रात्री उशिरा पदभार स्वीकारला.

गोंडवाना विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांना माननीय राज्यपाल कार्यालयाकडून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून पदाची सूत्रे सांभाळण्याचे आदेश प्राप्त झाले होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात डॉ. प्रशांत बोकारे यांनी बुधवारी रात्री प्रभारी कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल यांच्यासह सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, अधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर

ई मासिक **विद्यासंवाद**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ १०० शताब्दी वर्ष १९२३ - २०२३

जानेवारी २०२४ | आवृत्ती-०७



मार्गदर्शक
**डॉ. प्रशान्त बोकारे**
प्रभारी कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**
प्र-कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर




मा. राज्यपाल
**श्री. रमेश बैस**



मा. प्रभारी कुलगुरु
**डॉ. प्रशान्त बोकारे**



मा. प्र-कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**

विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन-जय करावया।।





# विद्यापीठाचे मल्टीस्टोरी मल्टीपरपज इनडोअर स्टेडियम ६ महिन्यांत होणार पूर्ण

## प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी घेतला आढावा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने सरकारने दिलेल्या शंभर कोटी रुपयांच्या निधीमधून महाराष्ट्रातील पहिले मल्टीस्टोरी मल्टीपरपज इनडोअर स्टेडियम येत्या सहा महिन्यांत पूर्ण होणार आहे. विद्यापीठाचे रवी नगर स्थित रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण परिसरातील सुभेदार क्रीडागृहाचे मागील जागेत सदर इनडोअर स्टेडियमची निर्मिती करण्यात येत आहे. या इनडोअर स्टेडियमबाबत कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ रोजी आढावा बैठक घेतली. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता जे. एच. भानुसे, विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे वरिष्ठ सदस्य डॉ. धनंजय वेळूकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता वर्षा घुशे, उपअभियंता अतुल गोटे, शाखा अभियंता मोना नंदेश्वर, विद्यापीठ अभियंता (प्रभारी) नितीन विश्वकार आणि क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी उपस्थित होते.

नागपूरसह विदर्भातील खेळाडूंना सर्वोत्तम सुविधा मिळाव्या म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. विविध सुविधांमध्ये भर पडावी म्हणून शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सरकारने विद्यापीठाला शंभर कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे. यातील ४४.४४ कोटी रुपयांमधून महाराष्ट्रातील पहिले भव्य मल्टीस्टोरी मल्टीपरपज इनडोअर स्टेडियम विद्यापीठाचे क्रीडा संकुल परिसरात साकार होत आहे. या इनडोअर स्टेडियम करिता राज्य शासनाकडून २० कोटी रुपयांचा निधी पहिला हप्ता म्हणून प्राप्त झाला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पा करिता विद्यापीठाने आर्किटेक म्हणून आनंद सारडा यांची नियुक्ती केली आहे. प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी याबाबत संपूर्ण माहिती जाणून घेतली. इनडोअर स्टेडियममध्ये १० खेळांच्या रात्र -दिवस स्पर्धा घेता येणार आहेत. तसेच नियमित सरावाकरिता देखील इनडोअर स्टेडियम उपलब्ध राहणार आहे. बास्केटबॉल, हँडबॉल, टेबल टेनिस, जिम्नॅस्टिक, इनडोअर कबड्डी, जुडो, वूशू, बॅडमिंटन, स्वॅश, कुस्ती आदी खेळांच्या सुविधा या इनडोअर स्टेडियममध्ये राहणार आहे. मल्टी स्टोरी मल्टी परपज इनडोअर स्टेडियममध्ये दहा खेळांच्या सुविधेसह कॅफेटेरिया, मीटिंग हॉल, कॉन्फरन्स हॉल, प्रशासकीय कार्यालय, जिम्नॅशियम, भव्य पार्किंग परिसर राहणार आहे.

विद्यापीठाद्वारे या प्रकल्पासाठी तांत्रिक समितीचे गठन करण्यात आले आहे. त्यात क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांचेसह शारीरिक शिक्षण व क्रीडा मंडळाचे सदस्य डॉ. धनंजय वेळूकर, अर्जुन व द्रोणाचार्य पुरस्कार्थी विजय मुनीश्वर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता वर्षा घुशे, उपअभियंता अतुल गोटे, आर्किटेक्ट आनंद सारडा, विद्यापीठ अभियंता (प्रभारी) नितीन विश्वकार, उपअभियंता महेंद्र पाटील यांचा समावेश आहे.

### बास्केटबॉल -हँडबॉल स्पर्धांसाठी इनडोअर सुविधा

बास्केटबॉल तसेच हँडबॉल खेळाच्या स्पर्धा या स्टेडियम मुळे इनडोअर घेता येणार आहे. दिवस तसेच रात्रीच्या वेळेस फ्लड लीट मध्ये स्पर्धा घेण्याची सुविधा या स्टेडियम मध्ये राहणार आहे. त्यामुळे येथील खेळाडूंना मोठा वाव मिळणार आहे. तिसऱ्या मजल्यावर बॅडमिंटन सह इतर खेळांच्या स्पर्धेकरिता सुविधा राहणार आहे.










# विद्यार्थ्यांनो तुम्हीच भारताचे भविष्य

## लेफ्ट. जनरल चीफ ऑफ स्टाफ सदर्न कमांड मनजीत कुमार यांचे प्रतिपादन

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पदके व पारितोषिक वितरण सोहळा



विद्यार्थ्यांनो, तुम्हीच भारताचे भविष्य आहात असे प्रतिपादन लेफ्टनंट जनरल चीफ ऑफ स्टाफ सदर्न कमांड मनजीत कुमार यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पदके व पारितोषिके वितरण सोहळा अंबाझरी रोडवरील गुरुनानक भवन येथे शुक्रवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची मंचावर उपस्थिती होती.

तरुण हा प्रत्येक परिवर्तनात्मक कार्यासाठी उत्प्रेरक आहेत. मग ते संशोधन आधारित तंत्रज्ञानाची प्रगती असो, नाविन्यपूर्ण शोध, उद्योजक उपक्रम, स्टार्ट अप क्रांती, शाश्वत उपाय शोधण्याच्या मोहिमा, नागरी जबाबदाऱ्यांचे पालन आणि तत्सम प्रयत्न असो यामध्ये विद्यार्थ्यांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे श्री मनजीत कुमार पुढे म्हणाले. आज आपला देश भविष्याविषयी तुमच्याकडून आत्मविश्वासपूर्ण आशावाद करीत आहे. तुमच्यासारखे प्रेरक, तेजस्वी आणि स्वयंपूर्ण तरुण- तरुणी मोठ्या संख्येने संधींची वाट पाहत आहे. मोठे ध्येय ठेवा आणि नवीन संधी मिळविण्यासाठी सज्ज व्हा. चांगले नागरिक बनण्यासाठी आत्मविश्वासाने पुढे जा, तुमच्या स्वप्नांचा पाठलाग करा, प्रगतिशील आणि वैविध्यपूर्ण भारताच्या ध्येयासाठी तुमच्या खास पद्धतीने योगदान द्या, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी विद्यापीठाच्या वाटचाली विषयी माहिती दिली. प्रमुख अतिथी लेफ्टनंट जनरल चीफ ऑफ स्टाफ सदर्न कमांड मनजीत कुमार यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च दीक्षाभूमी नागपूर येथील विद्यार्थी प्रणय आनंद पवार याला एमबीए परीक्षेत सर्वाधिक ७ सुवर्णपदके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथील विद्यार्थी ज्ञानेश्वर भागवत नेहरकर याला बीए एलएलबी (पाच वर्षीय अभ्यासक्रम) परीक्षेत ५ सुवर्णपदके व २ पारितोषिके, डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर येथील विद्यार्थिनी मेघा तेजवंत पोटदुखे हिला एमए (मराठी) परीक्षेत ५ सुवर्णपदके व १ पारितोषिक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे स्नातकोत्तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग येथील बहि:शाल विद्यार्थी सचिन चरणजी देव याला एमए (बुद्धिस्ट स्टडीज) परीक्षेत ५ सुवर्णपदके, डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर येथील विद्यार्थी अजय अरविंद खोब्रागडे याला एमए (डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा) परीक्षेत ४ सुवर्णपदके व १ पारितोषिक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्वायत्त पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थिनी प्राची हरीश त्रिवेदी हिला ४ सुवर्णपदके, स्वायत्त पदव्युत्तर औषधी निर्माणशास्त्र विभागातील विद्यार्थिनी स्नेहा संजय वट्टे हिला ३ सुवर्णपदके तर पदव्युत्तर शिक्षण विभागातील निखिल विनायक इंगळे याने ३ सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.

या सोहळ्यात संलग्नित महाविद्यालयातील एकूण १०१ प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना १४२ सूवर्ण पदके, ८ रौप्य पदके व २५ पारितोषिके तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्वायत्त विभागातील ४४ विद्यार्थ्यांना ५३ सुवर्णपदके व एक पारितोषिके प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला व्यवस्थापन परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य, अधिसभा सदस्य, विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले.




# लोकच संविधानिक लोकशाही जिवंत ठेवू शकतात - प्रा. घोडेस्वार

## विद्यापीठ शताब्दी महोत्सव व संविधान अमृत महोत्सव व्याख्यानमाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन आणि विचारधारा विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सव व संविधान अमृत महोत्सवानिमित्त विद्यापीठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास व विचारधारा विभागाने वर्षभरात ७५ व्याख्याने आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची सुरुवात बुधवारी अमरावती रोडवरील दीक्षांत सभागृहात आयोजित 'संविधान निर्मितीची प्रक्रिया आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावरील व्याख्यानाने झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ.शामराव कोरेटी होते. प्रमुख वक्ते म्हणून आंबेडकरी विचारवंत व लेखक संविधान बनवण्याच्या प्रक्रियेची माहिती देताना प्रा. देविदास घोडेस्वार म्हणाले की, काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष असल्याने पं. जवाहरलाल नेहरूंनी संविधान कसे असावे यासाठी ८ मुद्द्यांवर प्रस्ताव मांडला होता. यावर चर्चा सुरू झाल्यावर प्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना बोलण्याची संधी देण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पहिल्यांदा बोलण्याची संधी मिळेल, अशी अपेक्षा नव्हती. पण त्यांची पांडित्य आणि ज्ञान पाहून डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना प्रथम बोलण्याची संधी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नेहरूंच्या प्रस्तावाविरुद्ध आपले मत व्यक्त करतील किंवा अस्पृश्यतेवरच बोलतील, असे काँग्रेसजनांना वाटले. त्यासाठी काँग्रेसजनांनीही त्याला विरोध करण्याची तयारी केली होती. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बोलायला सुरुवात केल्यावर प्रत्येकजण राष्ट्रवादाच्या भावनेने ओतप्रोत झाला. निषेध करण्याऐवजी ते त्यांच्या भाषणादरम्यान टेबल थोपटत राहिले. राष्ट्र कसे असावे याची संपूर्ण मांडणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडली. ते म्हणाले की, प्रस्तावात फक्त हक्क नमूद केले आहेत, परंतु त्यांच्या संरक्षणाची हमी दिलेली नाही. जेव्हा संरक्षणाची हमी दिली जाईल तेव्हाच अधिकार यशस्वी होतील. हा देश आणि राष्ट्र आपले आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले. एखाद्या व्यक्तीच्या, नेत्याच्या किंवा पक्षाच्या प्रतिष्ठेपेक्षा देशाची प्रतिष्ठा महत्त्वाची असते. त्यासाठी द्वेष, भेदभाव बाजूला ठेवून एकत्र आले पाहिजे. वेळ आणि परिस्थिती अनुकूल असेल तर कोणतीही शक्ती आपल्याला एकत्र येण्यापासून रोखू शकत नाही. संविधान-लोकशाही जिवंत ठेवण्यासाठीच जनताच प्रयत्न करू शकते, यावर त्यांनी भर दिला. देशाला एकसंध ठेवायचे असेल, तर बहुमताच्या जोरावर निर्णय घेण्याऐवजी संवादातून निर्णय घ्यावे लागतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधान सभा आणि मसुदा समितीचे अध्यक्ष कसे झाले, याची संपूर्ण कहाणीही घोडेस्वार यांनी सांगितली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संविधान सभेला येण्यापासून रोखण्यासाठी काँग्रेसने आपली सर्व ताकद लावली होती. त्यांचा मुंबईकडून पराभव झाला. बंगालमधून जोगेंद्रनाथ मंडल यांच्या प्रयत्नाने ते विजयी झाले. मुंबईतील काँग्रेस सदस्य जयकर यांच्या रिक्त झालेल्या जागेवरून त्यांना बिनविरोध निवडून आणणे काँग्रेसला भाग पडले. कारण संविधानासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आवश्यक झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन विभाग प्रमुख डॉ.अविनाश फुलझेले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान निर्मितीतील योगदानावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघाची विजयी सुरुवात
## राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव



डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ लोणेरे यांच्या यजमानपदाखाली सुरु असलेल्या राज्य क्रीडा महोत्सवातील फुटबॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाने पहिल्याच लढतीत प्रतिस्पर्धीला मात देत स्पर्धेत विजयी सुरुवात केली आहे.स्पर्धेत शनिवारी झालेल्या लढतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाने औरंगाबाद विद्यापीठाचा ४-० ने धुव्वा उडवित अगदी धडाक्यात विजयी सलामी दिली आहे. सामन्यात सुरुवातीपासूनच विद्यापीठाच्या महिला संघाचे वर्चस्व पाहायला मिळाले. नागपूर स्नेहा उईकेने २ तर श्रृती कोलते आणि अश्विनी भालधरेने एक गोल नोंदवित संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. तर पुरुष गटात झालेल्या लढतीतही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने दमदार खेळ करीत सामन्यात महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायंस, नाशिकचा ३-० ने पराभव करीत स्पर्धेत दमदार सुरुवात केली आहे. या सामन्यात नागपूर संघाच्या बादल सोरेनने दोन तर गौरव सायरेने एक गोलचे योगदान देत संघाच्या विजयात मोलाची भुमिका बजाविली. स्पर्धेत विजयी सुरुवात करणाऱ्या पुरुष व महिला फुटबॉल संघाच्या कामगिरीबद्दल नागपूर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या फुटबॉल संघाची विजयी घोडदौड राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव



दमदार खेळाच्या जोरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोनेरे यांच्या यजमानपदाखाली सुरु असलेल्या राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवातील फुटबॉल स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यातही विजय नोंदवित स्पर्धेत आगेकूच कायम ठेवली आहे.

स्पर्धेत रविवारी झालेल्या सामन्यात विद्यापीठाच्या पुरुष संघाने नाशिकच्या वायसीएमओयू संघाचा २-० ने पराभव केला. सामन्यात नागपूरच्या मो. मोईज आणि बादल सोरेनने प्रत्येकी एक गोल नोंदवित संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. तर महिला संघाने देखील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा १-० ने पराभव करीत पुढील फेरीत प्रवेश निश्चित केला आहे. विजयी संघाकडून अश्विनी भालधरेने एकमेव गोल नोंदवित नागपूर विद्यापीठ संघाच्या विजयात मोलाची भुमिका बजाविली. याशिवाय कबड्डी स्पर्धेत विद्यापीठाच्या पुरुष संघाने नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा ३८-२१ अशा गुणांनी पराभव करीत दमदार सुरुवात केली. नंतरच्या लढतीत यजमान डॉ. आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ लोनेरे संघाचा ५१-१० अशा गुणांनी धुव्वा उडवित स्पर्धेत दणदणीत विजयाची नोंद केली. तर खोखो पुरुष गट स्पर्धेत नागपूर विद्यापीठाने राहुरी संघाचा १ डाव व ७ गुणांनी पराभव करीत चांगली सुरुवात केली असल्याची माहिती नागपूर विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी दिली.







## 'नेतृत्वातील महिला' विषयावर विकास कार्यक्रम
### विद्यापीठ महिला अभ्यास आणि विकास केंद्राचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला अभ्यास आणि विकास केंद्राच्या वतीने 'नेतृत्वातील महिला' विषयावर विद्याशाखा विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट अकादमी, पुणे आणि विद्यापीठ महिला अभ्यास आणि विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्याशाखा विकास कार्यक्रम २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२४ दरम्यान पार पडला.

विद्यापीठाच्या महिला अभ्यास आणि विकास केंद्र येथे एमएसएफडीए सहसंचालक श्री. मिथिलेश भाकरे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, समन्वयक डॉ. रेखा शर्मा, समन्वयक तथा महिला अभ्यास आणि विकास केंद्राच्या प्रभारी संचालक डॉ. मंगला हिरवाडे यांच्या उपस्थितीत "नेतृत्वातील महिला" या विषयावर पाच दिवसीय विद्याशाखा विकास कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. माजी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी महिला नेतृत्वाचे महत्त्व अधोरेखित केले. श्री मिथिलेश भाकरे यांनी एमएसएफडीएचे मुख्य उद्दिष्ट, शैक्षणिक पद्धती नवनवीन करणे हे असल्याचे सांगितले. कोणत्याही अडथळ्याशिवाय, रचना आणि कठोर कार्यपद्धती यासाठी त्यांनी विविध विद्यापीठे आणि संस्थांशी सहकार्य केल्याचे त्यांनी सांगितले. एमएसएफडीए सद्यस्थितीत मानसिक आरोग्य आणि मानसशास्त्र, अपंगत्व (शारीरिक आणि मानसिक) आणि लिंग (लिंग संवेदना, महिला नेतृत्व) यासारख्या विविध कार्यक्रमांवर कार्य करीत आहेत.

संपूर्ण विद्याशाखा विकास कार्यक्रम हा महिला अभ्यास दृष्टीकोन, महिला आणि शैक्षणिक नेतृत्व, महिला आणि प्रशासन, महिला आणि वैयक्तिक-व्यावसायिक भूमिका आणि महिला आणि संशोधन या पाच थीममध्ये विभागले गेले होते. डॉ संपदा नासेरी, डॉ. मृणालिनी फडणवीस, डॉ. वैशाली पाटील, डॉ. मिना काळे आणि डॉ. रेखा शर्मा यांनी रिसोर्स पर्सन म्हणून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा मुख्य केंद्रबिंदू समाजातील रोल

मॉडेल यांनी त्यांचा शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रवास शेअर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. एक्यूप्रेशर थेरपिस्ट डॉ. पराग कुलकर्णी यांचे "ॲक्युप्रेशर" या विषयावर एक सत्र आयोजित केले होते. एक भारतीय चिकित्सा प्रणाली असल्याचे त्यांनी सांगितले. समारोपिय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. यावेळी शिक्षण मंचच्या अध्यक्षा डॉ.कल्पना पांडे, मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी, पीएएच सोलापूर विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, डॉ. रेखा शर्मा, आयक्यूएसी समन्वयक डॉ. स्मिता आचार्य, डॉ. मंगला हिरवाडे आदी उपस्थित होते.

माननीय कुलगुरू डॉ.सुभाष चौधरी यांनी मार्गदर्शन करताना महिला जन्मजात नेत्या असतात, असे प्रतिपादन केले. शिक्षण मंच अध्यक्ष डॉ. कल्पना पांडे यांनी महिलांमध्ये स्वभावाने अनेक गुण असतात आणि त्या अनेक काम करणाऱ्या असतात, असे सांगितले. डॉ. शामराव कोरेटी यांनी अशा प्रकारचे विद्याशाखा विकास कार्यक्रम आयोजित करण्याच्या आवश्यकतेवर लक्ष केंद्रित केले. कार्यक्रमामध्ये महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, गोंदिया आणि नागपूर या भागातील एकूण ३४ महिला शिक्षक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अपर्णा समुद्र यांनी केले तर अवंती चाफळे यांनी आभार मानले.




## गुड न्यूज बाय अँथनी टमरेलने पटकावला सिनेस्टोरी पुरस्कार




### विद्यापीठाच्या पदव्युत्तर जनसंवाद विभागाचे आयोजन
### विविध स्पर्धांमधून विद्यापीठ लोकाभिमुख - कुलगुरू

विविध उपक्रम तसेच स्पर्धांच्या माध्यमातून विद्यापीठाला लोकाभिमुख केले जात असल्याचे प्रतिपादन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर जनसंवाद विभागाच्या वतीने आयोजित सिनेस्टोरी स्पर्धेचा पुरस्कार वितरण समारंभ मंगळवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडला. यावेळी कुलगुरू डॉ. चौधरी मार्गदर्शन करीत होते. या स्पर्धेत नागरिक गटात संत्रा बर्फी टीमचा 'टमरेल' तर विद्यार्थी गटात डब्बा टीमच्या 'गुड न्यूज बाय अँथनी' लघुपटाने सिनेस्टोरी पुरस्कार पटकावला.

पदव्युत्तर जनसंवाद विभागाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ सुभाष चौधरी होते तर प्रमुख अतिथी म्हणून मराठी चित्रपट दिग्दर्शक तृषांत इंगळे, विभाग प्रमुख डॉ. मोईज मन्नान हक, परीक्षक अनुराग कुलकर्णी, पुरस्काराचे प्रायोजक ऑटो ट्रेडच्या रूपल अनासाने यांची उपस्थिती होती. विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविले जात असल्याची माहिती कुलगुरू डॉ. चौधरी यांनी पुढे बोलताना दिली. विद्यार्थी तसेच सर्व सामान्य नागरिकांना सहभागी करून घेता यावे म्हणून या स्पर्धेकरिता समाजपयोगी विषय देण्यात आला होता. सोबतच विद्यापीठ हे केवळ पदवी देणारे नसून नागरिकांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणारे केंद्र आहे. शताब्दी महोत्सव निमित्त समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचा विद्यापीठ प्रयत्न करीत असल्याचे कुलगुरू म्हणाले.

यावेळी प्रमुख अतिथींच्या हस्ते नागरिक गटात २५ हजार रुपये रोख प्रथम पुरस्कार पटकविणारे संत्रा बर्फी टीम मधील हर्ष पंचलवार, जॉन विंडझेडगे, सार्थक देव, किसन चौधरी, रुपेश गोंगल यांचा सत्कार करण्यात आला. द्वितीय क्रमांकाचा १५ हजार रुपये रोख पुरस्कार 'घाणेरडा' लघुपटाचे हर्षल चांदेकर, अंकुश मोरे, स्नेहा भूषण अंकर तसेच १० हजार रुपयांचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार पटकाविणारे ब्रिथ ४०४ लघुपटातील सिद्धांत क्षीरसागर, प्रणव जैन, निखिल कोसेकर यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थी गटात २५ हजार रुपयांचा प्रथम क्रमांक पटकाविणारे डब्बा (गुड न्यूज बाय अँथनी) लघु पटातील ब्रायन डोंगरदिवे, गायत्री शिंगणापुरे, मॅथ्यू थॉमस, आकांक्षा कटेंगे, सिफा अन्सारी यांचा सत्कार करण्यात आला. १५ हजार रुपयांचा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार पटकाविणारे 'प्रारंभ' लघुपटातील नितीन मरसकोले, ऋतिका किन्हेकर, विशाल खर्चवाल तर १० हजार रुपयांचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार पटकाविणारे रोशन सोनवणे, आकाश खंडारे व अतुल संजू यांचा अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सिनेस्टोरी या लघुपटाचे परीक्षण पत्रकार प्रदीप मैत्र, आदित्य शर्मा व अनुराग कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमाला शताब्दी महोत्सव कक्षाचे डॉ. संतोष कसबेकर, डॉ. अनंत पांडे, शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री. प्रदीप बिनीवाले यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. मोईज मन्नान हक्क यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन सोनू शर्मा पुरस्कार वितरणाचे संचालन प्रिया जैस यांनी केले तर आभार प्रतीक्षा वासनिक या विद्यार्थिनीने मानले.



# संशोधनासाठी उपलब्ध होणार जनगणनेची माहिती
## जनगणना संचलन संचालनालयाचा विद्यापीठासोबत सामंजस्य करार

विद्यार्थी, शिक्षकांना संशोधनासाठी जनगणनेची माहिती आता उपलब्ध होणार आहे. याकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने जनगणना संचलन संचालनालय यांच्यासोबत सामंजस्य करार केला आहे. सामंजस्य करार हस्तांतरण सोहळा विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभा कक्षात मंगळवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडला. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी आणि जनगणना संचलन संचालनालयाच्या संचालक डॉ. निरुपमा डांगे यांनी सामंजस्य करार हस्तांतरित केला.

सभा कक्षात झालेल्या कार्यक्रमाला माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, जनगणना संचलन संचालनालय मुंबईच्या संचालक डॉ. निरुपमा डांगे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानव्य विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अशोक बोरकर, डॉ. सत्यप्रिय इंदूरवाडे, जनगणना संचलन संचालनालय मुंबई कार्यालयातील डेप्युटी रजिस्टर जनरल श्री. ए.एन. राजू, सहसंचालक (आयटी) व्ही. एक. अहिरे, सहसंचालक वाय. एस. पाटील, उपसंचालक किरण गुरव, सहाय्यक संचालक (आयटी) प्रवीण भगत यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह यांनी या सामंजस्य कराराबाबत माहिती दिली. सोबतच जनगणना संचलन संचालनालय मुंबई येथील उपस्थित प्रतिनिधींचे त्यांनी विद्यापीठाच्या वतीने स्वागत केले. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी जनगणना संबंधी संशोधन करणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांना विद्यापीठातील जनगणना डेटा संशोधन कार्य केंद्राचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. जनगणना संचलन संचालनालयाचे डेप्युटी रजिस्टर जनरल श्री. ए.एन. राजू यांनी सभा कक्षात पावर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे जनगणना त्याचप्रमाणे विद्यापीठात स्थापित करण्यात आलेल्या जनगणना डेटा संशोधन कार्यकेंद्र या ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या माहिती बाबत सादरीकरण केले. भारतामध्ये १८७२ पासून जनगणनेस प्रारंभ झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. १८८१ पासून प्रत्येक १० वर्षांनंतर जनगणना केली जात आहे. याकरिता मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ लागत असून भारत सरकारकडून जनगणनेचे कार्य केल्या जाते. जनगणनेसंबंधी १९४८ मधील कायद्याचे कलम १५ नुसार वैयक्तिक माहिती उघड करता येत नसल्याची माहिती त्यांनी दिली. विद्यापीठात स्थापन करण्यात आलेल्या केंद्राच्या मदतीने जनगणनेबाबत संशोधनास वाव मिळणार आहे. यावेळी उपस्थित त्यांचे आभार डॉ. सत्यप्रिय इंदुरवाडे यांनी मानले.

### जनगणना डेटा संशोधन कार्यकेंद्र उद्घाटित

विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील सांख्यिकी विभागात जनगणना डेटा संशोधन कार्य केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे उद्घाटन माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे व जनगणना संचलन संचालनालयाच्या संचालक डॉ. निरुपमा डांगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्यासह विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, शिक्षक व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.





## कलेच्या कौशल्यातून स्वतःची ओळख निर्माण करा

### माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे आवाहन - रसायनशास्त्र विभागात वार्षिक स्नेहमिलन संमेलन

प्रत्येकामध्ये वेगळी अंगभूत कला असते. या कलेच्या कौशल्यातून स्वतःची ओळख निर्माण करण्याचे आवाहन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यार्थ्यांना केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागात वार्षिक स्नेहमिलन सोहळ्याचे उद्‌घाटन बुधवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी पार पडले. या सोहळ्याचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. चौधरी बोलत होते. रसायनशास्त्र विभागातील सभागृहात आयोजित उद्‌घाटन या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एन. एन. यांना करडे, समन्वयक डॉ. आर. एस. डोंगरे, केमिकल सोसायटी अध्यक्ष चैतन्य गाडेकर, उपाध्यक्ष पृथा देवईकर उपस्थित होते. पुढे बोलताना कुलगुरू डॉ. चौधरी यांनी अशा सांस्कृतिक कार्यक्रमातून तुमच्यातील विशिष्ट कौशल्य समोर येते असे सांगितले. विशेष कौशल्यामुळे आत्मविश्वास वाढत असून जीवनातील नैराश्य दूर करण्याचे काम देखील करते. स्वतःमधील चांगल्या सवयीला छंद म्हणून बाळगा, असे कुलगुरू म्हणाले. माहिती व ज्ञान अशा दोन प्रकारचे शिक्षण असते. आपण शिक्षणातून सर्व स्तरावरील ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सर्व स्तरातील ज्ञान तुम्हाला असेल तर पुढे जाण्यापासून कोणीच रोखू शकणार नाही असे कुलगुरू म्हणाले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना झालेल्या मित्रांना आपण कायम स्मरणात ठेवतो. शिवाय निस्वार्थ मैत्री याच काळात होते. मैत्रीचा धागा असाच कायम राहावा, असे कुलगुरू म्हणाले. वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन झाल्याचे त्यांनी घोषित केले. स्वागतपर भाषणात डॉ. आर. एस. डोंगरे यांनी विभागातील विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रास्ताविक करताना विभाग प्रमुख डॉ. एन. एन. करडे यांनी विद्यार्थी सांस्कृतिक- क्रीडा कलागुणांचे सादरीकरण या स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून करतात, असे सांगितले. भविष्यात या कलागुणांचा उपयोग होतो असे ते म्हणाले. कार्यक्रमाला विभागातील डॉ. ममता लांजेवार, डॉ. रवीन जुगादे, डॉ. विजय तांगडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### गायक वाटकर भगिनींचा सत्कार

स्नेहसंमेलन उद्‌घाटन कार्यक्रमात गायक धनश्री व भाग्यश्री वाटकर भगिनींचा कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. धनश्री व भाग्यश्री या दोघीही विभागाच्या विद्यार्थिनी आहेत. यावेळी त्यांनी त्यांचे आवडते 'हम कथा सुनाते' हे गाणे सादर केले. या गाण्याला उपस्थित विद्यार्थ्यांनी भरभरून दाद दिली.









## मोडीलिपी ही आद्यलिपी - डॉ. संजय दुधे

### मोडी लिपी प्रचार व प्रसार प्रशिक्षण कार्यशाळा - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे आयोजन

मोडी लिपी ही आद्य लिपी असल्याचे प्रतिपादन प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील इतिहास विभागाच्या सभागृहात मोडी लिपी प्रचार व प्रसार या विषयावरील प्रशिक्षण कार्यशाळा गुरुवार, दिनांक ८ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडली. विद्यापीठाचा इतिहास विभाग व पुराभिलेख संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत डॉ. संजय दुधे मार्गदर्शन करीत होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे होते. प्रमुख अतिथी म्हणून मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, मुंबई अभिलेखाधिकारी श्री एम. डी. राजपूत, विदर्भ अभिलेखाधिकारी श्री. के. डी. खंडारे, तज्ञ म्हणून अमोल महल्ले, पंकज पाटील व नरेश जोशी यांची उपस्थिती होती. महाराष्ट्रात सुमारे १२ व्या शतकापासून ते २० व्या शतकापर्यंत मोडी लिपीचे अस्तित्व आहे. मोडी लिपीतील हे साहित्य राजे -महाराजे तसेच पेशवेकालीन दस्तावेज म्हणून अस्तित्वात असल्याचे डॉ. दुधे यांनी पुढे बोलताना सांगितले. बाराखडीतील अक्षरे तसेच अंकलिपीतील १ ते ० हे मोडी लिपीतील आहे. मात्र, वर्तमान स्थितीत कोणती अक्षरे मोडी लिपीतील आहे, हे कळत नाही. मोडी लिपीतील अक्षराबाबत माहिती व्हावी म्हणून पुराभिलेख संचालनालयाच्या मदतीने या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. मोडी लिपीतील एका शब्दात अनेक अर्थ असून अनेक ग्रंथांचे लेखन या लिपीत झाले आहे. वाचता येत नाही म्हणून मोडी लिपी कळत नाही. मात्र, मोडी लिपीची ओळख झाल्यास वाचक निर्माण होईल, तसेच अनेक साहित्य समोर येईल असा विश्वास डॉ. दुधे यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविक करताना अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील माहिती दिली. कालबाह्य होत असलेल्या मोडी लिपीला काही अंशी पुनर्जीवित करून त्याचा इतिहासाच्या विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना उपयोग व्हावा. तसेच, शासकीय कार्यालयातील कागदपत्रांचे वाचन / लिप्यांतर होऊन त्याचा व्यवहारिक उपयोग व्हावा ही काळाची गरज ओळखून इतिहासाचे विद्यार्थी, प्राध्यापक, इतिहास संशोधक, शासकीय / निमशासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्याकरिता या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. कार्यशाळेत तज्ञ अमोल महल्ले, पंकज पाटील व नरेश जोशी यांनी मोडी लिपीतील अक्षरांची ओळख करून दिली. कार्यशाळेत विविध मोडी लिपी बाबत त्यांनी माहिती दिली. कार्यशाळेला मोठ्या संख्येने प्रतिनिधी उपस्थित होते.




## कृतिशील, प्रायोगिक शिक्षणाचे शिक्षकांना धडे

### महाराष्ट्र राज्य विद्याशाखा विकास अकादमीची कार्यशाळा

कृतिशील तसेच प्रायोगिक शिक्षण विद्यार्थ्यांना देता यावे म्हणून शिक्षकांना याबाबत अवगत करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्या शाखा विकास अकादमीच्या (एमएसएफडीए) वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात कार्यशाळा घेण्यात आली. विद्यापीठाच्या गणित विभागातील श्रीनिवास रामानुजन सभागृहात ही कार्यशाळा गुरुवार दिनांक ८ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडली. उच्च शिक्षणामधील होत असलेल्या विविध बदलांबाबत या कार्यशाळेत चर्चा करण्यात आली.

कार्यशाळेच्या उद्घाटन या कार्यक्रमाला एमएसएफडीएचे कार्यकारी संचालक डॉ. निपुण विनायक (आयएएस), गाजियाबाद येथील नॉलेज लिंकचे श्री निशीत कुमार, मुंबई विद्यापीठातील एमएसएफडीएच्या सदस्य डॉ. सीबिल थॉमस, विद्यापीठाच्या आयक्यूएसी समन्वयक डॉ. स्मिता आचार्य यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या कार्यशाळेत सहभागी शिक्षक तसेच प्रतिनिधींसोबत उच्च शिक्षणातील बदलांबाबत चर्चा करण्यात आली. शिक्षण क्षेत्रात आल्यानंतर प्रत्येक प्रतिनिधींकडून त्यांचे अनुभव कथनकाच्या स्वरूपात घेण्यात आले. चार्ट पेपर तयार करणे पावर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे सादरीकरण, समूह प्रेझेंटेशन त्याचप्रमाणे समूह चर्चा आदी विविध उपक्रम राबविण्यात आले. प्रायोगिक शिक्षण, सर्जनशीलता आणि नवीनता, ज्ञानाच्या पलीकडे शिकणे, बहुविद्याशाखीय शिक्षण, विविधता आणि समावेश तसेच वैज्ञानिक स्वभाव आणि तर्कशुद्ध विचार या विषयावर माहितीचे आदान प्रदान कार्यशाळेत करण्यात आले.

### विभाग स्तरावर कार्यशाळा

महाराष्ट्र राज्य विद्या शाखा विकास अकादमीच्या (एमएसएफडीए) वतीने एक दिवसीय प्रादेशिक कार्यशाळांची मालिका महाराष्ट्रातील सहा विभागांमध्ये आयोजित केली जात आहे. ही एक बहु-भागधारक सल्लामसलत कार्यशाळा आहे. ज्यात प्राध्यापक, सदस्य आणि प्राथमिक सहभागी म्हणून उच्च शिक्षण घेत असलेले विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विभागातील उच्च शिक्षण क्षेत्रात सामील असलेल्या विविध भागधारकांच्या क्षमता अंतर आणि गरजा ओळखण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले.




## महफिले मुशायरा आणि बज्मे अफसाना
### विद्यापीठाच्या पदव्युत्तर उर्दू विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर उर्दू विभागाच्या वतीने महफिले मुशायरा आणि बज्मे अफसाना कार्यक्रमाचे आयोजन मंगळवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले. उद्घाटनिय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. दुधे यांनी उर्दू भाषेविषयी प्रेम व्यक्त करीत उर्दू ही आपली भाषा असल्याचे सांगितले. उर्दू ही भारतीय भाषा असून याच देशात उगम होत विस्तारत गेल्याचे सांगितले. कार्यक्रमाला उपस्थित मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वातंत्र्य आंदोलनात नागरिकांना एकत्र आणण्यात या भाषेचे फार मोठे योगदान असल्याचे सांगितले. तत्पूर्वी उर्दू विभाग प्रमुख आणि समन्वयक डॉ. संतोष गिरहे यांनी प्रास्ताविक करीत पाहुण्यांचे स्वागत केले. स्वागतपर भाषणामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना कथा लेखनाच्या सुरुवातीबाबत मार्गदर्शन केले. नागपूर येथील साहित्यकार तथा प्रमुख अतिथी डॉ. शरफुद्दीन साहिल यांनी नागपूर येथील कथांची परंपरा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विशेष अतिथी जफर कलीम साहब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उर्दू शायरीतील अनेक शायरीच्या माध्यमातून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. उद्घाटन सत्राचे संचालन डॉ. समीर कबीर यांनी केले तर आभार गुलफेशा अंजुम यांनी मानले.

### साहित्यिकांची शायराना प्रस्तुती

दुसऱ्या सत्रात महफिले अफसानामध्ये अतिथी वक्ता व अफसाना निगार डॉ. शरफुद्दीन साहिल, डॉ. अजहर अबरार, डॉ. अजहर हयात, श्री बाबर शरीफ, डॉ. समीर कबीर यांनी प्रस्तुती केली. सत्राचे संचालन डॉ. असरार अहमद यांनी केले तर आभार सहायक प्राध्यापक सना बानो यांनी मानले. तिसऱ्या सत्रात महफिले मुशायरामध्ये कवी तथा शायर डॉ. शरफुद्दीन साहिल, श्री रियाजुद्दीन कामिल, श्री रेहान नासिर, श्री. अजजहर हुसैन, श्री शमशाद शाद, श्री समीर कबीर, श्री बाबर शरीफ, श्री ख्वाजा साजिद, श्री नईम अंसारी, श्री शादाब अंजुम, श्री सतीशचंद्र रागेट, श्रीमती मिली पांडे, श्रीमती स्वाती सानी यांनी त्यांचे साहित्य प्रस्तुत केले. संचालन मोहम्मद सोहेल अन्सारी यांनी केले तर आभार डॉ. शाहिस्ता तबस्सुम यांनी मानले. कार्यक्रमाला उर्दू विभागातील सर्व प्राध्यापक डॉ. समीर कबीर, डॉ. शाइस्ता तबस्सुम, डॉ. अस्मत कौसर, डॉ. सबीहा खुर्शीद, डॉ. सुमैया अफशां, डॉ. तरन्नुम नियाज, डॉ. मेहर यासमीन, सना बानो, गुलफेशां अंजुम, श्रीमती नेहा लसने व विद्यार्थी उपस्थित होते

# स्नेहसंमेलनातून कलागुणांची उधळण

## रक्तदान शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद - रसायनशास्त्र विभागात वार्षिक स्नेहमिलन संमेलन





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागात सुरू असलेल्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी कलागुणांची उधळण केली. यामध्ये घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते उद्घाटन झाल्यानंतर स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी इंडोअर खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य, गीत गायन स्पर्धा, फॅन्सी ड्रेस कॉम्पिटिशन, त्याचप्रमाणे विविध खेळांचे आयोजन केले होते. रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एन. एन. यांना करडे, समन्वयक डॉ. आर. एस. डोंगरे, डॉ. ममता लांजेवार, डॉ. रवीन जुगादे, डॉ. विजय तांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. केमिकल सोसायटी अध्यक्ष चैतन्य गाडेकर, उपाध्यक्ष पृथा देवईकर यांच्यासह अन्य विद्यार्थ्यांकडून कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

### २४ जणांचे रक्तदान

रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सामाजिक दायित्व पार पाडत स्नेहसंमेलनात रक्तदान शिबिराचे आयोजन केले. यामध्ये २४ दात्यांनी रक्तदान केले. इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रक्तपेढीचे अधिकारी डॉ. शिवशक्ती, समाजकार्य अधीक्षक चेतन मेश्राम, नर्सिंग ऑफिसर वंदना भगत, तंत्रज्ञ प्रशांत देशमुख, सहकारी म्हणून अनिल खोटे, अनुष्का, रिया सिंग, हुदा खान व शशांक यांनी रक्तदान शिबिराला सहकार्य केले.




# स्वामीनारायण शाळेसाठी विद्यापीठात परिसर मुलाखती

## प्रशिक्षण व रोजगार विभागाचे आयोजन

शहरातील नामवंत अशा स्वामीनारायण शाळेतील विविध पदांकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात परिसर मुलाखत घेण्यात आल्या. रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने अंबाझरी रोडवरील विद्यापीठाच्या ललित कला विभागात शुक्रवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित हा कॅम्पस ड्राईव्ह पार पडला.

या कॅम्पस ड्राईव्ह करिता विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन स्वामीनारायण शाळेचे प्रशासक विकास मारिया, मनुष्यबळ व्यवस्थापक रेणू जोशी यांची उपस्थिती होती. कॅम्पस ड्राईव्ह मध्ये कलाशिक्षक, गणित, हिंदी, मराठी, संस्कृत, संगीत, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, शारीरिक शिक्षण व क्रीडा आदी विविध विषयातील शिक्षक पदाकरिता चाळणी परीक्षा घेण्यात आली. या चाळणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. कॅम्पस ड्राईव्ह यशस्वी करण्याकरिता ललित कला विभागाच्या विभागप्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांचे मोलाचे सहकार्य लाभले.






## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वुशू संघाची घोषणा
### अ. भा. आंतरविद्यापीठ स्पर्धेत होणार सहभागी

जम्मू विद्यापीठाच्या यजमानपदाखाली जम्मू येथे १३ ते १७ फेब्रुवारी दरम्यान आयोजित होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वुशू स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला व पुरुष संघाची घोषणा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी केली.

**विद्यापीठाचा महिला संघ-** दिप्ती पाटील, दृष्टी नेरीकर, अश्विनी ढेंगे, आर्या शिंगणापूरे (सर्व सेवादल महिला महाविद्यालय), मानसी चौके (श्री बिंझाणी सिटी कॉलेज), प्रणिता रहांगडाले (यशवंत महा. वर्धा), अश्लेषा वर्मा (न्यू आर्ट्स, कॉमर्स, सायंस कॉलेज), आचल खातदेव (जीएस कॉमर्स कॉलेज, वर्धा). **वेट कॅटगिरी-** शिल्पा गायधने (एमबी पटेल कॉलेज), रोहीत थोरात (राणी अग्निहोत्री कॉलेज, वर्धा), तनुश्री वासनिक (एसबी सिटी कॉलेज), साक्षी मोहिते, मनिका परीहार (शिवाजी सायंस कॉलेज), सोनाली भोयर (एसएन मोर कॉलेज), किर्ती कुमरे (पीजीटीडी रातुम विद्यापीठ). **पुरुष संघ-** अल्पेश बावनकर (सीपी अँड बेरार कॉलेज), रोहीत थोरात (राणी अग्निहोत्री कॉलेज वर्धा), तेजस पालकर (सेवादल महाविद्यालय), यश कांबळे (डॉ. आंबेडकर कॉलेज), अभिषेक सोनवने (बजाज कॉलेज, वर्धा), कोमल बारापात्रे (शारी. शिक्षण महाविद्यालय कोराडी). **वजन गट-** दर्शन येरपुडे, आर्यन यादव (पुजा शारी. शिक्षण कॉलेज), संदेश गोरे, रवी सिंग (राणीबाई अग्निहोत्री कॉलेज), मोहीत यादव (सीजे पटेल कॉलेज), श्रेयल रंखम (सेंट विन्सेट पलोटी), आयुष निखारे (डॉ. एम. वासनिक पीडब्ल्यूएस), हर्षित, राहिल शर्मा (ज्योतिबा कॉलेज), आर्यन शर्मा (तिरपुडे शारी. शिक्षण कॉलेज), अक्षय गवई (डॉ. आंबेडकर कॉलेज). प्रशिक्षक - प्रफुल गजभिये, सौरभ बोरकर, व्यवस्थापक - मेघा निमजे.





## पीजी विद्यार्थ्यांसाठी आंतर-विद्यापीठ मौखिक सादरीकरण स्पर्धा
### पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने शुक्रवार, ९ फेब्रुवारी २०२४ रोजी आंतर-विद्यापीठ मौखिक सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पीजी विद्यार्थ्यांसाठी वन्यजीव संरक्षण या थीमवर ही स्पर्धा घेण्यात आली.

स्पर्धेच्या निमंत्रक प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.(सौ.) व्ही.टी. धुर्वे, आयोजन सचिव डॉ. एस. सी. मसराम होते. समन्वयक डॉ. ए. एम.नागवंशी, डॉ. एम. टी. ठाकरे, डॉ. यु. ए. जीवनतारे, श्री. पवन चणकापुरे, श्री. स्वप्नील शहारे, कु. अंकिता शर्मा आणि कु. धरिता जोशी होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ अशा विविध विद्यापीठे आणि स्वायत्त महाविद्यालयातील एकूण २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि दोन तांत्रिक सत्रांमध्ये थीमनुसार मौखिक सादरीकरणे दिली.

स्पर्धेचे परीक्षण व वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एन. एम. डोंगरवार व एलआयटी युनिव्हर्सिटी नागपूर येथील बायोकेमिस्ट्री विभाग प्रमुख डॉ. अर्चना मून यांनी केले. उद्घाटन कार्यक्रमाचे आभार डॉ. ए. एम. नागवंशी यांनी मानले. समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे माजी प्राध्यापक आणि प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी. डी. बारसागडे होते. कै. डॉ. एस.एम.खतीब, कै. डॉ. व्ही. के. ठाकरे आणि कै. डॉ. डी. आर. पाटील यांच्या नावावर असलेल्या लाडक्या प्राध्यापकांच्या स्मृतीप्रित्यर्थ डॉ. डी. डी. बारसागडे यांनी प्रायोजित केलेली ३ रोख बक्षिसे होती आणि ५ प्रोत्साहनपर बक्षिसे प्रायोजित केली होती. या स्पर्धेत डॉ. एस. एम. एच खतीब स्मृती प्रथम पारितोषिक सुश्री लिना ए. स्वू यांनी, डॉ. व्ही. के. ठाकरे स्मृती द्वितीय पारितोषिक श्री हर्ष तिवारी, डॉ. डी. आर. पाटील स्मृती तृतीय पारितोषिक आरती डी. मेश्राम यांनी पटकावले. प्रोत्साहनपर पारितोषिक अमर खुरपडे, कु.अमिषा वैद्य, कु. श्वेता मासे, श्री. प्रणव गायकवाड, आणि कु. धनश्री कावळे यांनी पटकावले. शेवटी, कु. धरिता जोशी यांनी आभार मानले.



## यवतमाळ जिल्ह्यातील पाचखेड येथे उत्खनन

### प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्व विभागाला बहुमान

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्व विभागाने यवतमाळ जिल्ह्यातील बाबुळगाव तालुक्यात असलेल्या पाचखेड येथील पुरातत्त्व स्थळावर उत्खनन सुरू केले आहे. विभागाने माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांच्या शुभहस्ते उद्घाटन करून रविवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२४ रोजी उत्खननास सुरुवात केली आहे.



भारतीय पुरातत्व सर्वेक्षण महासंचालक यांच्याकडून पाचखेड येथे उत्खनन करण्यासाठी विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्व विभागाला परवाना प्राप्त झाला आहे. विभाग प्रमुख डॉ. प्रबास साहू यांच्या मार्गदर्शनाखाली हे उत्खनन केले जाणार आहे तर डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे हे सहसंचालक आहेत.

पाचखेड हे महाराष्ट्राच्या यवतमाळ जिल्ह्यातील बाबुळगाव तालुक्याच्या महसुली कार्यक्षेत्रात येणाऱ्या चंद्रभागा आणि वर्धा या दोन नद्यांच्या संगमापासून सुमारे १ किमी दक्षिण-पूर्वेस चंद्रभागा नदीच्या डाव्या तीरावर वसलेले आहे. पुलगाव-बाबुळगाव रस्त्यावर सिंधी गावाच्या पूर्वेस ३ किमी आणि यवतमाळ शहरापासून ४३ किमी अंतरावर हे गाव आहे. या वस्तीच्या पुरास्थळीला स्थानिक पातळीवर 'सासु-सुनेचे उखाडे' आणि 'बरड' म्हणून ओळखले जाते.

### उत्खननाची वैशिष्ट्ये

यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी (१९७९ व १९८४) येथील उत्खननातून मिळालेल्या सांस्कृतिक अनुक्रमांची तुलना करणे. नागपूर जिल्ह्यातील आदमशी असलेली आत्मीयता तपासणे. पश्चिम व पूर्व विदर्भातील लोहयुगीन समाजाची संलग्नता पाहणे. भोकरदन ते पवनी यांना जोडणाऱ्या सातवाहन काळातील व्यापारी मार्गावर असल्याने स्थळांचे महत्त्व तपासणे. मानवी विध्वंसामुळे पुरातत्वीय खुणा पूर्णपणे नष्ट होण्याच्या मार्गावर आहे आणि म्हणूनच त्याची पुनर्प्राप्ती होणे आवश्यक आहे. एम ए भाग १ व २ च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमाचा भाग म्हणून प्रशिक्षण देण्यासाठी हे उत्खनन केले जात आहे.

या ठिकाणी उत्खननाची उद्घाटन माननीय प्र-कलगुरु डॉ. संजय दुधे यांच्या शुभहस्ते रविवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, पाचखेडच्या सरपंच सौ. कल्पना वानखेडे, पोलीस पाटील धनश्री देशमुख, माजी सरपंच देशमुख, शिक्षक दिनेश पसारे यांची उपस्थिती होती. यावेळी विभागातील डॉ. एकता धारकर, डॉ. मोहन पारधी, डॉ. अमरदीप बारसागडे, डॉ. के एस चंद्रा, बिपिन बनसोड, चेतना वढावे, संशोधक तन्मय हवलदार, निहा रिछारिया, सुशांत बेगडे, मनीषा पिल्लारे, गजानन मेश्राम, राजेश शिरसुदे यांच्यासह एमए १ व २ मधील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.




# डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात सिम्पोझियम

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व हायकोर्ट बार कौन्सिल असोसिएशनचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय आणि हायकोर्ट बार कौन्सिल असोसिएशन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने एडीआर प्रोफेशनल ऑर्गनायझेशनच्या वतीने सिम्पोझियम आयोजित करण्यात आले. एका संक्षिप्त परंतु ज्ञानवर्धक सत्रात, लवाद आणि मध्यस्थी या विषयावरील परिसंवादात उपस्थितांना विवादांचे प्रभावीपणे निराकरण करण्यासाठी मौल्यवान धोरणे आणि तंत्रे यांची माहिती देण्यात आली.

अतिथी वक्ते माननीय न्या. फर्डिनो रेबेलो आणि माननीय श्री. बी.पी. धर्माधिकारी यांनी मध्यस्थी आणि मध्यस्थीबाबत उपस्थितांना संबोधित केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या उद्घाटन कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर उपस्थित होते. एलएलबी आणि बीएएलएलबीच्या विद्यार्थ्यांसह न्यायालयातील अनेक वकील उपस्थित होते. या चर्चासत्राने संघर्ष निराकरणात त्यांचे कौशल्य वाढवण्यास उत्सुक आहेत अशा विविध श्रोत्यांना आकर्षित केले. परिसंवादाची सुरुवात एआर द्वारा वैकल्पिक निराकरण पद्धतींच्या परिचयाने आणि महत्त्वाने झाली. एडीआर व्यावसायिक संस्थेचे संचालक अविनाश पेंडसे, अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश माननीय न्या. फर्डिनो रेबेलो आणि माननीय श्री. बी. पी. धर्माधिकारी यांनी उपस्थितांना एडीआरची गरज सांगितली आणि मध्यस्थीच्या तत्त्वांविषयी माहिती दिली. उपस्थितांनी दोन पद्धतींमधील फरकांबद्दल विस्तृत माहिती दिली. त्यांच्या संबंधित फायदे आणि मर्यादांबद्दल जाणून घेतले. प्रास्ताविक सत्रानंतर, सहभागींनी वास्तविक-जगातील लवाद आणि मध्यस्थी परिस्थितीचे अनुकरण करण्याचे कौशल्य जाणून घेतले. क्षेत्रातील अनुभवी व्यावसायिकांनी घेतलेल्या सत्रातून उपस्थितांना वाटाघाटीचे तंत्र समजले आणि मध्यस्थी प्रक्रियेची सखोल माहिती विकसित झाली. संपूर्ण परिसंवादात, वक्त्यांनी संघर्षांचे निराकरण करण्यासाठी संवाद, सहानुभूती आणि सर्जनशील समस्या सोडवण्याच्या महत्त्वावर भर दिला. सहभागींना सहयोगी दृष्टीकोन अवलंबण्यासाठी आणि सहभागी सर्व पक्षांच्या हितसंबंधांना प्राधान्य देणारे परस्पर फायदेशीर उपाय शोधण्यासाठी प्रोत्साहित केले गेले. लवाद आणि मध्यस्थी बद्दलचा हा परिसंवाद संघर्ष निराकरणात सतत शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या महत्त्वाचा पुरावा म्हणून काम करतो. उपस्थितांना व्यावहारिक रणनीती आणि अंतर्दृष्टीने सुसज्ज करून, सेमिनारने त्यांना आत्मविश्वास आणि सक्षमतेने विवादांकडे जाण्याचे सामर्थ्य दिले आहे. डॉ. रविशंकर मोर यांनी औपचारिक आभार मानले. प्रा. मृण्मयी कुकडे यांनी शिक्षक समन्वयक म्हणून सहकार्य केले तसेच रिया कोठले, साक्षी धोपाडे व संपन्न पांडे यांनी विद्यार्थी समन्वयक म्हणून सहकार्य केले.





# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात संत सेवालाल महाराज जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात संत सेवालाल महाराज जयंती गुरुवार, दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ रोजी साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री गणेश कुमकुमवार यांच्या शुभहस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सर्वश्री मोरेश्वर उमरेडकर, नरेंद्र पवार, कार्तिक हरडे, शितल शेटे, प्रकाश कुंजाम यांच्यासह अन्य उपस्थित होते.




## विद्यापीठाच्या खेळाडूंनी ऑलिम्पिकचे लक्ष्य ठेवावे

### प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे यांचे प्रतिपादन - खेलो इंडियासाठी विद्यापीठाच्या संघाची घोषणा

खेळाडूंना सर्व प्रकारच्या सुविधा देण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ सदैव तत्पर राहणार आहे. विद्यापीठाने दिलेल्या सुविधांचा पुरेपुर लाभ खेळाडूंनी घ्यावा. तसेच ऑलिम्पिकमध्ये सहभागी होण्याचे लक्ष्य सर्व खेळाडूंनी ठेवावे, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी व्यक्त केले. खेलो इंडिया विद्यापीठ गेम्ससाठी जाणाऱ्या विद्यापीठ संघास ध्वज प्रदान करण्याचा सोहळा रवी नगरातील क्रीडा परिसरात नुकताच पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. धनंजय वेळुकर, अरुणराव कलोडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन जंगीटवार, विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. संजय चौधरी, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी आदी उपस्थित होते. याप्रसंगी पुढे बोलतांना डॉ. दुधे म्हणाले, खेळाडूंनी आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी आणि ठाम निर्णयाच्या जोरावर स्पर्धेत उतरावे. कुठल्याही प्रकारचा तणाव न घेता स्पर्धेत पदक मिळवित पालक आणि विद्यापीठाचे नाव मोठे करा, असा सल्ला त्यांनी यावेळी दिला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी तर संचालन अर्चना कोट्टेवार यांनी व आभार प्राचार्य डॉ. विवेकानंद सिंग यांनी मानले. याप्रसंगी डॉ. दुधे यांच्या हस्ते विद्यापीठ संघाचे कर्णधार कल्याणी चुटे आणि यश गुल्हाने यांना ध्वज वितरण करण्यात आले. विद्यापीठाचे खेळाडू योगासन, ॲथलेटिक्स, फेन्सिंग, टेबलटेनिस, बॉक्सिंग, कुस्ती या क्रीडा प्रकारात सुमारे ३९ खेळाडू सहभागी होणार आहे.

**योगासन संघ-** वैभव श्रीरामे, प्रणय कंगाले, वंश खिंची (एसबी सिटी कॉलेज), हर्षल चुटे (प्रियदर्शनी अभियांत्रिकी कॉलेज), वैभव देशमुख (कमला नेहरु कॉलेज), ओम राखडे (धनवटे नॅशनल कॉलेज). कल्याणी चुटे, सुहानी गिरीपुंजे (एसबी सिटी कॉलेज), छकुली सेलोकार, रचना अंबुलकर (प्रियदर्शनी अभियांत्रिकी कॉलेज), अलिशा गायमुखे (कमला नेहरु कॉलेज), श्रेया धामडे (नबीरा कॉलेज). **प्रशिक्षक-** डॉ. तेजसिंह जगदाळे.

**ॲथलेटिक्स-** सौरव तिवारी (एसबी सिटी कॉलेज), राजन यादव (पीडब्ल्यूएस कॉलेज), आदर्श भुरे (डॉ. आर. जी. भोयर कॉलेज, सेलू), नेहा ढबाले (प्राचार्य अरुणराव कलोडे कॉलेज), रिया दोहतरे (चक्रपाणी कॉलेज), मिताली भोयर (एमएम सायंस कॉलेज). **प्रशिक्षक-** डॉ. आदित्य सोनी.

**बॉक्सिंग-** युवराज शेराम (ज्योतिबा शारी. शिक्षण कॉलेज), अभिषेक जांगीड (डॉ. आंबेडकर कॉलेज). **प्रशिक्षक** गणेश पुरोहित. फेन्सिंगआरुषी सिंग (हिस्लॉप कॉलेज), निलोफर पठाण, तन्नु डुंबारे, हिमानी घोडमारे (भिवापूर महाविद्यालय). **प्रशिक्षक-** नंदकुणाल धनविजय.

**जलतरण-** रिद्धी परमार (डॉ. आंबेडकर कॉलेज), स्नेहल जोशी (शासकीय अभियांत्रिकी कॉलेज), संजना जोशी (एलएडी कॉलेज), अक्षता झाडे, यश गुल्हाने (जीएच रायसोनी कॉलेज). प्रशिक्षक डॉ. प्रवीण लामखेडे.

**कुस्ती-** संदीप, प्रमोद कुमार, रोहित सिंग, बिरेंद्रर धांडा (ज्योतिबा कॉलेज), कुणाल कुमार (राणी अग्निहोत्री कॉलेज वर्धा). **प्रशिक्षक-** निलेश राउत.

**टेबलटेनिस-** वैभव राणे (जीएच रायसोनी कॉलेज), जयेश कुळकर्णी, आदी चिटणीस (डॉ. आंबेडकर कॉलेज), रजत तोरसकर (सीपी अँड बेरार), कौस्तुभ उदार (एसजी गुल्हाने प्रेरणा कॉलेज). **प्रशिक्षक-** अजय कांबळे. **विद्यापीठ संघाचे व्यवस्थापक**- डॉ. मनोज आंबडकर, डॉ. व्ही. एन. सिंग.

# छत्रपती शिवाजी महाराजांची लोककल्याणकारी राज्याची संकल्पना संपूर्ण जगासाठी आदर्श







## संभाजीनगर येथील डॉ. रमेश पांडव यांचे प्रतिपादन
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त व्याख्यान

छत्रपती शिवाजी महाराज यांची लोककल्याणकारी राज्याची संकल्पना संपूर्ण जगासाठी आदर्श निर्माण करणारी असल्याचे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथील जीएमएनआयआरडीचे माजी संचालक डॉ. रमेश माधवराव पांडव यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९४ व्या जयंती निमित्त सोमवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२४ रोजी व्याख्यान पार पडले. यावेळी डॉ. पांडव मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. व्याख्याते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथील जीएमएनआयआरडीचे माजी संचालक डॉ. रमेश माधवराव पांडव तर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची मंचावर उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समकालीन इस्लामी राज्यात जनतेच्या अन्न, वस्त्र, निवारा आदी गरजा पूर्ण होत नव्हत्या. महात्मा ज्योतिबा फुले यांचा पोवाडा तसेच काही पत्रांचा आधार घेत सर्वसामान्य जनतेच्या गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांना हिंदवी स्वराज्य स्थापन करावे लागले, असे डॉ. पांडव यांनी पुढे बोलताना सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे राज्य लोककल्याणकारी सुराज्य कसे निर्माण झाले याचा त्यांनी विविध पत्र तसेच समकालीन साहित्याचे दाखले देत उलगडा केला. आश्रयाला आले त्याचे कल्याण हाच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सुराज्याचा मध्यबिंदू होता, असे ते म्हणाले. वयाच्या ९ व्या वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याणकारी मुद्रा घेतली ती कायम ठेवली. ३५० वर्ष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याला झाली आहेत. जगभरातील कल्याणकारी राज्याला छत्रपती शिवाजी महाराज आदर्श वाटतात, याचा खोलवर जाऊन अभ्यास करण्याची आवश्यकता डॉ. पांडव यांनी व्यक्त केली.

यावेळी अध्यक्षीय भाषण करताना डॉ. सुभाष चौधरी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे अनेक पैलू संशोधनातून उघड होतील, असे सांगितले. समाजाच्या गरजा लक्षात घेत स्थानिक पातळीवर संशोधन करीत त्याला जागतिक पातळीवर नावे. त्याचप्रमाणे शताब्दी वर्षानिमित्त विद्यापीठाने सुरू केलेल्या 'रिचिंग टु अनरीच्ड' अभियानाबाबत माहिती दिली. संशोधनासाठी विद्यापीठाच्या रुसा केंद्राला भारत सरकारकडून २० कोटी रुपयांचा निधी मिळाल्याचे कुलगुरूंनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले.



## विद्यापीठ ज्ञान स्त्रोत केंद्रात छत्रपती शिवाजी महाराज जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रामदास पेठ ज्ञान स्त्रोत केंद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती निमित्त सोमवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२४ रोजी साजरी करण्यात आली. ज्ञान स्त्रोत्र केंद्राची संचालक डॉ. विजय खंडाळ यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला हारार्पण करण्यात आले. यावेळी सहाय्यक ग्रंथपाल डॉ. पूजा दाढे यांच्यासह कर्मचारीवविद्यार्थी उपस्थितहोते.





## अनुभवात्मक शिक्षणाबाबत विद्यापीठात कार्यशाळा

### गांधी विचारधारा विभाग, महाराष्ट्र राज्य विद्याशाखा - विकास अकादमी व आयआयटी मुंबई यांचा संयुक्त उपक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात केस स्टडीवर आधारित अनुभवात्मक शिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. विद्यापीठाचा पदव्युत्तर गांधी विचारधारा विभाग, महाराष्ट्र राज्य विद्या शाखा विकास अकादमी (MSFDA) आणि आयआयटी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर गांधी विचारधारा विभाग येथे संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी दोन तुकड्यांमध्ये २२ ते २५ जानेवारी २०२५ अशी चार दिवसांची कार्यशाळा पार पडली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अंमलबजावणीसाठी पुढाकार म्हणून आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी ही कार्यशाळा आयोजित केली होती. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी कार्यशाळेचे औपचारिक उद्घाटन केले. आपल्या उद्घाटन भाषणात त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अंमलबजावणीसाठी या कार्यशाळेच्या गरजेवर भर दिला. कार्यशाळेचा उद्देश केस स्टडीवर आधारित अनुभवात्मत शिक्षण यशस्वी अंमलबजावणीसाठी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे हा होता. दोन दिवसांच्या कार्यक्रमात, पहिल्या दिवशी आयआयटी मुंबईच्या प्रशिक्षकाने केस स्टडीची उद्दिष्टे आणि प्रक्रियेची तपशीलवार माहिती दिली. इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेले काही नमुना प्रकरण अभ्यास सहभागींसोबत शेअर केले आहेत. दुसऱ्या दिवशी, विद्यार्थ्यांना केस स्टडी करण्यासाठी साइट व्हिजिटसाठी गावात नेण्यात आले. पहिल्या तुकडीच्या विद्यार्थ्यांनी वर्धा जवळील देवळी सावंगीला भेट दिली आणि दुसऱ्या तुकडीने आओलेघाट (वन न प्रभावित गाव) आणि कोलितमारा (ट्रायबल व्हिलेज) या गावांना भेट दिली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिस्तीनुसार आणि आवडीनुसार गावातील विविध पैलूंचा शोध घेतला त्यांनी केस स्टडीची व्याप्ती ओळखण्यास शिकले आणि काही वास्तविक डेटा देखील लक्षात घेतला. प्रत्येकाने तयार केलेला प्रकरण अहवाल एमएसएफडीए-आयआयटीबी प्रकल्प व्यवस्थापक डॉ. गोपाल चव्हाण कडे सादर करण्यात आला.

या कार्यशाळेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठासोबत संलग्न विविध महाविद्यालये आणि विविध शाखांमधील एकूण ४० प्राध्यापक आणि ६४ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला, ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी गांधी विचार विभागाचे प्रमुख प्रा. प्रमोद व्ही. वाटकर, डॉ. नरेंद्र चौधरी व इतर सहयोगी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी येत्या शैक्षणिक सत्रापासून "केस स्टडी बेस्ड एक्सपेरिअन्शिअल लर्निंग" च्या अंमलबजावणीबद्दल आत्मविश्वास व्यक्त केला.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या योगासन संघाचे अभूतपूर्व यश

### खेलो इंडिया विद्यापीठ गेम्स सलग तिसऱ्यांदा मिळविले पदक




आसाम, गुवाहाटी येथे सुरू असलेल्या चवथ्या खेलो इंडिया विद्यापीठ गेम्स मध्ये योगासन स्पर्धेत पुरुष गटात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाने धडाकेबाज कामगिरी करीत सुवर्ण पदक प्राप्त केले. सलग तिसऱ्यांदा पदक प्राप्त करण्याची कामगिरी विद्यापीठ संघाने केली आहे.

स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष संघाने ४२२.०८ गुणांसह प्रथम क्रमांक मिळवित सुवर्ण पदक आपल्या नावे केले. दुसरे स्थान ४२०.४१ गुणांसह पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीने प्राप्त केले. तर तिसरे स्थान ४१६.२५ गुणांसह हरिद्वारच्या कवी संस्कृती विद्यापीठाने प्राप्त केले.

किड्स भुवनेश्वर येथे झालेल्या दुसऱ्या खेलो इंडिया स्पर्धेत विद्यापीठाच्या पुरुष संघाचे सुवर्ण पदक थोडक्यात हुकले होते. त्यामुळे त्यांना रौप्य पदकावरच समाधान मानावे लागले होते. त्यानंतर या संघाने आपल्या कामगिरीत सुधारणा केली. मागील वर्षी जैन युनिव्हर्सिटी बंगलोर येथे झालेल्या तिसऱ्या खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदकाची कामगिरी केली होती, आणि यंदा लागोपाठ दुसऱ्या वर्षीही सुवर्णपदक मिळवून विद्यापीठाच्या खेळाडूंनी सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. डॉ. तेजसिंह जगदाळे यांच्या मार्गदर्शनात विद्यापीठाच्या पुरुष संघाने हे यश प्राप्त केले.

**योगासन संघात-** वैभव श्रीरामे, प्रणय कंगाले, वंश खिंची (एसबी सिटी कॉलेज), हर्षल चुटे (प्रियदर्शनी अभियांत्रिकी कॉलेज), वैभव देशमुख(कमला नेहरु कॉलेज), ओम राखडे (धनवटे नॅशनल कॉलेज) यांचा समावेश होता. डॉ. सोनाली सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीने या योगासन संघाची निवड केली. निवड समितीत डॉ. देवेंद्र वानखेडे, डॉ. कुमकुम बोरटकर, डॉ. तेजसिंह जगदाळे आणि निमंत्रित सदस्य म्हणून अनिल मोहगांवकर यांचा समावेश होता. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या योगासन पुरुष संघाने केलेल्या कामगिरीबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसेच माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे आदींनी पदक प्राप्त खेळाडूंचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.








## पीएम-उषा अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला २० कोटी रुपयांचे अनुदान

### प्रधानमंत्री उच्चत्तर शिक्षा अभियानाचा प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते आभासी पद्धतीने शुभारंभ

### विद्यार्थ्यांसाठी संशोधनात्मक तसेच मूलभूत सुविधा निर्माण करणार - कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी

भारत सरकारच्या उच्चत्तर शिक्षा विभागाच्या वतीने देशभरातील सार्वजनिक विद्यापीठे व महाविद्यालये यांचे सशक्तिकरण करणाऱ्या महत्त्वकांक्षी प्रधानमंत्री उच्चत्तर शिक्षा अभियाना (PM-USHA) चा शुभारंभ भारताचे मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आला. आभासी पद्धतीने झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रुसा केंद्राला २० कोटी रुपयांचे अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली. तत्पूर्वी मार्गदर्शन करताना विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी या निधीतून विद्यार्थ्यांसाठी संशोधनात्मक तसेच पायाभूत सुविधांची निर्मिती केली जाणार असल्याचे सांगितले.

जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात थेट प्रक्षेपण करण्यात आलेल्या कार्यक्रमाला माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे उपस्थित होते. प्रधानमंत्री उच्चत्तर शिक्षा अभियान (PM-USHA) अंतर्गत एकूण रुपये १२९०६.१ कोटी इतकी भक्कम राशी देशभरातील सार्वजनिक विद्यापीठे व महाविद्यालय यांच्या सशक्तीकरणाकरिता मंजूर करण्यात आली आहे. पीएम उषा या अभियानाची सुरुवात प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी आभासी पद्धतीने या कार्यक्रमात केली. तत्पूर्वी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी या अभियानाचा निधी प्राप्त करण्यामध्ये डॉ. रुपेश बडेरे यांचे फार मोठे योगदान असल्याचे सांगितले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालय व विद्यापीठ दोन्हीचे स्वतंत्र संचलन होणार आहे. विद्यापीठ हे आंतरविद्याशाथीय संशोधन केंद्र बनावे म्हणून ही वित्तीय तरतूद करण्यात आल्याचे कुलगुरूंनी सांगितले.

पीएम उषा अंतर्गत २० कोटी रुपयांच्या निधीतून आदिवासी इतिहास संग्रहालय आणि रुसा मल्टी फॅसिलिटी सेंटरला अत्याधुनिक संशोधन साहित्यातून नाविन्यपूर्ण बनविले जाणार आहे. सर्व स्वायत्त विभाग तसेच विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संशोधनासाठी रुसा केंद्रात अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामध्ये ५.५० कोटी रुपयांचे ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप, कॉनफोकल मायक्रोस्कोप, अल्ट्रा सेंट्रीफ्युज, प्लांट ग्रोथचेंबर, पॉली हाऊस, ॲनाकोंडा प्रोफेशनल वर्जन सॉफ्टवेअर, एसपीएसएस फॉर इकॉनॉमिक्स डिपार्टमेंट, एनव्हीआयडीआयए डीएचएक्स सिस्टीम, इंडिपेंडन्स ॲनॅलायझर, इंडिपेंडेंस ट्यूब फॉर साऊंड ॲबसार्पप्शन मेजरमेंट, डेन्सिटी अँड साऊंड वेलोसिटी मीटर, मायक्रो विस्को मिटर, व्हिडिओ कॅमेरा अँड नेसेसरी अटॅचमेंट, टेलीप्रॉम्प्टर अँड अटॅचमेंट, व्हिजन मिक्सर अँड स्टुडिओ पीसीआर, सुसज्ज संगणक लॅब, अत्याधुनिक खेळांच्या सुविधा साहित्य, विद्यार्थी व शिक्षकांसाठी कार्यशाळा, प्रशिक्षण आदी घेतले जाणार असल्याचे कुलगुरूंनी त्यांच्या भाषणात सांगितले. यावेळी माननीय कुलगुरूंनी विद्यापीठाला शताब्दी वर्षांमुळे प्राप्त १०० कोटी रुपयांमधून होत असलेल्या विविध विकासकामांबाबत माहिती दिली. आगामी काळात विद्यापीठ परिसरात परीक्षा भवन, बायोटेक्नॉलॉजी विभाग, मायक्रोबायोलॉजी विभाग, बायोकेमिस्ट्री विभाग, सेंटर फॉर एक्सलन्स, टेक्नॉलॉजी अँड एनर्जी पार्क, प्राचीन इतिहास वस्तू संग्रहालय यांच्या इमारती तर नव्याने नॅनो टेक्नॉलॉजी अँड इंजीनियरिंग- सेमीकंडक्टर विभाग सुरू केले जाणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता, विविध शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# विद्यापीठातील रक्तदान, नेत्र तपासणी व दंतचिकित्सा शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने आयोजन

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती पर्वाच्या निमित्ताने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात रक्तदान, डोळे तपासणी व दंत चिकित्सा शिबिराचे आयोजन मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ दरम्यान करण्यात आले. कर्मचारी मित्र परिवाराच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात आयोजित शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराचे उद्‌घाटन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रक्तपेढीचे डॉ. आकाश साखरकर, हरदेव आय केअर हॉस्पिटलचे डॉ. विजय जेसवाणी, देवांशी डेंटल क्लिनिकच्या डॉ. उज्वला अभय दातारकर, उपकुलसचिव डॉ. रमन मदने, उद्यान अधीक्षक श्री. प्रवीण गोतमारे, श्री दिनेश दखणे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शिबिरामध्ये ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिराकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अति विशेषोपचार रुग्णालयाच्या रक्त पेढीतील बीटीओ डॉ. आकाश साखरकर, सोशल सर्विस सुप्रीटेंडमेंट संदीप महाकाळकर, सहाय्यक रूपाली, कार्तिक, संदीप व नयना यांनी सहकार्य केले. नेत्र तपासणी शिबिर हरदेव आय केअर हॉस्पिटल लोकमत चौक यांच्या मदतीने घेण्यात आले असून १२५ पेक्षा अधिक जणांनी नेत्र तपासणी केली. हरदेव आय केअर हॉस्पिटलचे डॉ. विजय जेसवाणी, अश्विन चव्हाण, गायत्री बालपांडे, कमलेश डेकापूरकर, रोहित ठाकरे यांनी सहकार्य केले.




# विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात तणाव मुक्तीचे धडे

## पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात विद्यार्थ्यांना तणाव मुक्तीचे धडे देण्यात आले. मानव्य शास्त्रे विभागाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर होते.

गंभीर मानसिक आरोग्य समस्यांवर चर्चा करणारा सेमिनार प्रा. किशोर नैताम यांनी आयोजित केला होता. प्रख्यात शिक्षणतज्ञ कु. प्राजक्ता जोशी, मानसशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. पूजा मालवीय यांनी या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मानसिक आरोग्याशी संबंधित विविध विषयांवर प्रमुख वक्त्यांनी चर्चा केली. प्राजक्ता जोशी यांनी विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याच्या समस्यांविषयी अलीकडील आव्हाने हाताळण्यासाठी योग आणि ध्यान यासारखे तंत्र शिकवले. मानसिक आरोग्यामध्ये आपले भावनिक, मानसिक आणि सामाजिक कल्याण समाविष्ट आहे हे समजून घेण्यासाठी त्यांना मार्गदर्शन केले आहे. आपण कसे विचार करतो, अनुभवतो आणि कसे वागतो यावर त्याचा परिणाम होतो. ताण व्यवस्थापित करण्याच्या, इतरांशी संबंध ठेवण्याच्या आणि निवडी करण्याच्या आपल्या क्षमतेवर परिणाम होतो. हे केवळ मानसिक आजार नसणे नाही, तर भावनिक अवस्था आणि अनुभवांचा सातत्य असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. डॉ. पूजा मालवीय यांनी विद्यार्थ्यांना तणाव मुक्तीसाठी विविध उपक्रमांमध्ये कसे गुंतवून ठेवता येते याबाबत माहिती दिली. राज्यशास्त्र आणि मानसशास्त्र विभागादरम्यान एक परस्पर संवाद कार्यक्रम ठरला. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात एक अतिशय आकर्षक सत्र आयोजित केले गेले. विद्यार्थिनी सिमरन हिने संचालन केले होते.




# विद्यार्थी संसदेतून घडतील भविष्यातील नेते

## माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे प्रतिपादन - पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात विद्यार्थी संसद उपक्रम

विद्यार्थी संसदेतून भविष्यातील चांगले नेते घडतील असे प्रतिपादन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि क्रतुस्पर्ज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात विद्यार्थी संसद उपक्रम घेण्यात आला यावेळी कुलगुरू डॉक्टर चौधरी मार्गदर्शन करीत होते.

मानव्ये शास्त्र विभागातील सभागृहात झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून मानव्य विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. चौधरी यांनी विद्यार्थी संसदेचे महत्त्व अधोरेखित केले. लोकशाहीला बळकट करणारे चांगले नेते, चांगले व्यक्तिमत्व यातून तयार होत असून विद्यार्थी संसद हा याकरिता उत्कृष्ट मंच असल्याचे कुलगुरू म्हणाले. तरुण पिढीची बौद्धिक क्षमता वृद्धी, संसदीय कार्यपद्धती शिकणे आणि त्याचा अनुभव घेण्याकरिता हा उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे डॉ. चौधरी म्हणाले.

प्रास्ताविक करताना राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी विद्यार्थी संसद आयोजन करण्यामागील भूमिका विशद केली. यामध्ये विद्यार्थ्यांना गटचर्चा कशी करावी आणि निर्णय घेण्याच्या क्षमतेत क्षमतेचे प्रशिक्षण मिळत असल्याचे सांगितले. अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी समाजापुढे असलेल्या विविध समस्या अवगत करीत त्याची सोडवणूक करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये असल्याचे सांगितले. राज्यशास्त्र विभागातील श्री. किशोर नैताम, वैभव मेश्राम, प्रशिक गजभिये, पंकज सोमकुवर यांच्यासह स्वयंसेवक व क्रतुस्पर्ज यांच्या सदस्यांनी यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.






# लिंग भेदभाव संपविण्यासाठी स्वतःपासून करा सुरुवात

## माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांचे आवाहन - लिंग संवेदनाबाबत चित्रपट महोत्सव व एक दिवसीय कार्यशाळा

समाजामधील लिंग भेदभाव संपविण्यासाठी स्वतःपासून सुरुवात करा, असे आवाहन माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर गणित विभाग आणि मेन अगेन्स व्हायलंस अँड अब्यूज (MAVA), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने समभाव प्रवासी चित्रपट महोत्सव आणि लिंग संवेदनाबाबत एक दिवशीय कार्यशाळा घेण्यात आली. श्रीनिवास रामानुजन हॉल येथे बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडलेल्या कार्यक्रमात डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

उद्घाटनिय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, प्रमुख अतिथी म्हणून विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, गणित विभाग प्रमुख डॉ. गणेश केदार, मावा मुंबईचे श्री प्रवीण थोटे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना लिंग भेदभाव मानवनिर्मित असल्याचे सांगत पूर्वीपासूनच हा दुजाभाव होत आल्याचे सांगितले. घरापासूनच या भेदभावास सुरुवात होते. समाजाने महिलांना अनेक अलंकार दिले. आपण महिलेला देवी मानतो. मात्र, प्राधान्य देताना दुय्यम स्थान दिल्या जाते. हा भेदभाव संपूर्ण जगात होतो. आदिवासी समाजात आजही महिला सत्ताक प्रणाली आहे. आधुनिक काळात हा फरक निर्माण झाला. आपण या भेदभावाला संस्कृतीचे नाव दिले. ही काळी बाजू असून त्यामुळे महिलांवर अत्याचार होत आहेत. स्त्री- पुरुष समानता यावी म्हणून चित्रपट येत आहेत. समाजात एक प्रकारे असलेला भेदभाव संपविण्याचे प्रयत्न चित्रपटातून होत असल्याचे डॉ. दुधे म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना गणित विभाग प्रमुख डॉ. गणेश केदार यांनी कार्यशाळा आयोजनामागील भूमिका विशद केली. लिंगभेद होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती होण्याच्या दृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख अतिथी श्री. प्रवीण थोटे यांनी विविध लघु चित्रपटातून लिंग संवेदना व भेदभाव कशाप्रकारे केला जातो याची माहिती दिली. विविध उदाहरणे देत हा भेदभाव कश्या प्रकारे होतो, याची माहिती दिली. चित्रपटांचा आपणावर भरपूर प्रभाव पडत असल्याचे सांगत त्या माध्यमातून हा विषय योग्य प्रकारे हाताळला जात असल्याची त्यांनी सांगितले. ज्यूस, संडे अँड लिटल गॉडनेस, नटखट आदी लघु चित्रपट दाखविण्यात आले. सोबतच लघु चित्रपट आणि माध्यम जाहिरात या विषयावर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन नम्रता त्रिपाठी या विद्यार्थिनीने केले तर आभार ऋतुजा चंद्रिकापुरे हिने मानले. कार्यक्रमाला विभागातील विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## मातृभाषा व्यक्तिमत्व विकासाचा पाया - श्रद्धा भारद्वाज

### पदव्युत्तर हिंदी विभागात आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस



मातृभाषा व्यक्तीच्या चिंतनाची भाषा तसेच व्यक्तिमत्व विकासाचा पाया असल्याचे प्रतिपादन आकाशवाणी येथील उद्‌घोषिका श्रीमती श्रद्धा भारद्वाज यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पदव्युत्तर हिंदी विभाग आणि शिक्षण संस्कृती उत्थान न्यास विदर्भ प्रांत यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस कार्यक्रम घेण्यात आला. हिंदी विभागातील सभागृहात बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडलेल्या कार्यक्रमात श्रीमती श्रद्धा भारद्वाज मार्गदर्शन करीत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पदव्युत्तर इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. संजय पळवेकर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून नागपूर आकाशवाणी उद्‌घोषिका श्रीमती श्रद्धा भारद्वाज, संस्कृतीकर्मी श्री किशोर लालवानी यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना भाषांचे संरक्षण आणि संवर्धन मातृभाषेला हृदयात जतन करता येत असल्याचे श्रीमती भारद्वाज यांनी सांगितले. मातृभाषेचा विकास तसेच संरक्षणाची आवश्यकता जागतिक पटलावर व्यक्त होत आहे. ज्या प्रकारे मातृभाषा विलुप्त होत आहे, हा एक चिंतनाचा विषय आहे. त्यामुळे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेला प्रोत्साहन देण्यात आल्याचे भारद्वाज यांनी सांगितले.

प्रमुख अतिथी वक्ता प्रख्यात संस्कृतिकर्मी श्री किशोर लालवानी यांनी मार्गदर्शन करताना बालकाच्या जीवनात ज्या प्रकारे मातेचे महत्त्व आहे. त्याच प्रकारे मातृभाषेचे देखील अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे सांगितले. व्यक्तींच्या विचारांना फुलांसारखे फुलविण्यात मातृभाषेची महत्त्वपूर्ण भूमिका राहते. मातृभाषेच्या अभावात समाज निष्प्राण होतो असे सांगितले. कार्यक्रमाची अध्यक्षता करताना इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. संजय पळवेकर यांनी भारत हा बहुभाषी देश असल्याचे सांगितले. त्यामुळे प्रत्येक भाषेत अन्य बोली भाषेतील शब्द सहज येतात. वास्तविकेत मातृभाषेत पारंगत झाल्यानंतर आपण अन्य भाषा सहज शिकू शकतो. मातृभाषा केवळ संवादाचे माध्यम नाही तर संस्कृतीची संवाहक आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. जागृती सिंह यांनी मातृभाषेच्या मुळात लोक संस्कृती असल्याचे सांगितले. संस्कृतीनेच समाजात जीवन मूल्यांचे संवर्धन होत असून मातृभाषा दिवस पर्वावर मातृभाषेची प्रासंगिकता विचार करणारी आहे, असे सांगितले. यावेळी डॉ. लखेश्वर चन्द्रवंशी, डॉ. कुंजनलाल लिल्हारे, डॉ. एकादशी जैतवार, प्रा. दामोदर द्विवेदी, आकांक्षा बांगर यांच्यासह विभागातील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. आभार डॉ. सुमित सिंह यांनी मानले.





## विद्यापीठ महिला वसतीगृहात सीपीआरचे प्रात्यक्षिक

### हृदघात आलेल्या व्यक्तीचे प्राण वाचवण्याबाबत जागरूकता

हृदयघात आलेल्या व्यक्तीचे प्राण वाचविण्याबाबत प्रात्यक्षिक तसेच जागरूकता कार्यक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गांधी नगर येथील महिला वसतिगृहात पार पडला. हृदय-फुफ्फुस पुनरुत्थान Cardio Pulmonary Resuscitation (CPR) चे प्रात्यक्षिक यावेळी विद्यार्थिनींना दाखविण्यात आले.

हृदयविकाराचा झटका आलेल्या प्रौढ व्यक्तीला जीवन रक्षक प्रणाली प्रशाप्रकारे द्यावी या विषयावर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला भारतीय भूलशास्त्र तज्ञ सोसायटी नागपूरच्या अध्यक्ष डॉ. गौरी अरोरा, भारतीय भूलशास्त्र तज्ञ सोसायटी नागपूरच्या सचिव डॉ. दिलीप वासनिक, भूलतज्ञ डॉ. हेमांगी अभ्यंकर, महिला वसतीगृहाच्या वरिष्ठ अधीक्षिका डॉ. रिता वडेटवार, महिला वसतीगृह अधीक्षिका सरोज लांजेवार यांची उपस्थिती होती. व्यक्त्या डॉ. गौरी अरोरा यांनी यांनी मुलींना Cardio Pulmonary Resuscitation (CPR) म्हणजे काय?, त्याचा उपयोग कुठे आणि कसा करावा या बद्दल माहिती दिली. सार्वजनिक ठिकाणी अचानक आलेल्या हृदयविकाराचे झटके किंवा हृदयाघात आलेल्या व्यक्तीचे प्राण छातीवर दाब देऊन कसे वाचवता येईल हे सांगितले. हृदयाघात तसेच हृदयविकार संबंधित लक्षणे याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाच्या वक्त्या डॉ. गौरी अरोरा, डॉ. दिलीप वासनिक व डॉ. हेमांगी अभ्यंकर यांनी डमीच्या माध्यमातून प्रात्यक्षिक करून दाखविले. विद्यापीठ वसतीगृहातील सर्व मुलींना समजवून सांगितले. कार्यक्रमाचे संचालन वसतीगृहाची विद्यार्थिनी कु. जानवी मंजुळे हिने केले.




## अजीम प्रेमजी फाउंडेशनमध्ये आठ विद्यार्थ्यांची निवड
## रोजगार व प्रशिक्षण विभागाचा प्लेसमेंट ड्राईव्ह

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये ८ विद्यार्थ्यांची अजीम प्रेमजी फाउंडेशन मध्ये निवड झाली आहे. विद्यार्थ्यांची असोसिएट रिसोर्स पर्सन या पदावर नियुक्ती करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरात ५, ६ व ७ फेब्रुवारी २०२४ रोजी अजीम प्रेमजी फाउंडेशनचा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. असोसिएट रिसोर्स पर्सन या पदाकरिता घेण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यात १३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी चाळणी परीक्षेत २८ जण उत्तीर्ण झाले. यामधून मुलाखतीनंतर ८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये रसायनशास्त्र विभागातील चैतन्य गडेकर, स्वाती सुपारे, जागृती शुक्ला, मानसशास्त्र विभागातील अभिषेक उरकुडे, मुकेश तीतरे, इतिहास विभागातील आकाश रामटेके, गणित विभागातील वृषाली हेडाऊ तर वनस्पतीशास्त्र विभागातील पूनम मिश्रा यांचा समावेश आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, कर्नाटक, उत्तराखंड आदी राज्यांमध्ये नियुक्ती केली जाणार आहे. यावेळी अजीम प्रेमजी फाउंडेशनचे एचआर श्री अविनाश झाडे, विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांची उपस्थिती होती.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात संत गाडगेबाबा जयंती



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील तळमजल्यावरील सभागृहात शुक्रवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडलेल्या कार्यक्रमात सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री. गणेश कुमकुमवार यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला हारार्पण करण्यात आले. यावेळी कुलगुरू कार्यालयातील अधीक्षक श्री. सतीश साधनकर, सर्वश्री दिनकर क्षीरसागर, युडीसी शैलेश राठोड, जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, मनोज मोरे, रुपेश आतराम, अनिल खरे, कवडू भोयर, कार्तिक हरडे, प्रदीप झोडे, नरेंद्र पवार, शीतल शेटे, आसिफ शेख यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

## भारत रंग महोत्सवात
## 'मिले सुर मेरा तुम्हारा'ची प्रस्तुती
### ललित कला विभागातील विद्यार्थ्यांचे सादरीकरण



राष्ट्रीय नाट्य विद्यालय (NSD) व संस्कृती मंत्रालयाद्वारे आयोजित भारत रंग महोत्सवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभागातील विद्यार्थ्यांनी 'मिले सुर मेरा तुम्हारा' नाटकाचे सादरीकरण केले.

आंतरराष्ट्रीय भारतीय नाट्य महोत्सव प्रस्तुत जन भारत रंग या कार्यक्रमात ललित कला विभागातील विद्यार्थ्यांनी साई सभागृह येथे बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी 'मिले सुर मेरा तुम्हारा' या देशभक्तीपर नाटकाचा प्रयोग सादर केला. या नाटकाची संकल्पना व निर्मिती ललित कला विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांची आहे. नाटकाचे लेखन विजय जथे यांनी केले असून दिग्दर्शक पियुष धुमकेकर व ड्रेस डिजाइनर हर्षद साल्पे यांनी केले. या नाटकामध्ये पियूष धुमकेकर, विजय जथे, विवेक मिस्त्री, निखील टोंगळे, नासिर शेख, अक्षय माहूरिया, अपेक्षा आडे, राजश्री उपाध्ये, दीक्षा ढोमणे यांनी अभिनय केला.




# युवकांमध्ये आर्थिक सुरक्षिततेची आवश्यकता

## डॉ. तेजेन्द्रसिंग रावल यांचे प्रतिपादन

## राज्यशास्त्र विभागात 'आर्थिक सुरक्षा आणि युवक' विषयावर व्याख्यान

आजच्या तरुणासमोर अनेक प्रश्न आहेत. नकारात्मकता, संभ्रम सोबतच आर्थिक आव्हाने आहेत. त्याकरिता युवकांमध्ये आर्थिक सुरक्षा सुरक्षिततेची आवश्यकता ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन चार्टर्ड अकाउंटंट डॉ. तेजेंद्रसिंह रावल यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागाच्या वतीने गुरुवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ रोजी "आर्थिक सुरक्षा आणि युवक" या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानात प्रमुख वक्ते डॉ. रावल हे मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमात पुढे बोलताना डॉ. तेजेंद्र सिंह रावल यांनी तुमच्याकडे जितके आर्थिक साधने असतील तितके अनेक पर्याय उपलब्ध असतील असे सांगितले. त्यामुळे आर्थिक बचत करणे जीवनातील महत्त्वपूर्ण उपक्रम असला तरच भविष्यातील सुखकर जीवनाचा आनंद घेता येतो असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. किशोर नैताम यांनी केले. परिचय सिरत शेख यांनी करून दिला. संचालन विभागातील विद्यार्थिनी सिमरन हिने केले तर आभार अंजू भगत यांनी मानले. या कार्यक्रमाला लोकप्रशासन विभागाचे विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र वासनिक, इंग्लिश विभागाचे विभाग प्रमुख डॉ. संजय पळवेकर व राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील प्राध्यापक डॉ. अतुल मुन, डॉ. अभिषेक चिमणकर व इतर प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

# नेहा ढबालेला रौप्यपदक

## आदर्श भुरेने पटकाविले कांस्यपदक

## खेलो इंडिया विद्यापीठ गेम्स




गुवाहाटी आसाम येथे सुरु असलेल्या ४ थ्या खेलो इंडिया विद्यापीठ गेम्समध्ये ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या नेहा ढबाले आणि आदर्श भुरे याने पदक प्राप्त करण्याची कामगिरी केली आहे.

आयजी ॲथलेटिक्स स्टेडियम सरुसाजल येथे झालेल्या महिलांच्या ४०० मीटर हर्डल्स स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची नेहा ढबालेने १ मि. ०.३३ अशी वेळ देत रौप्यपदक प्राप्त केले. जानेवारी महिन्यात महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील ॲथलेटिक्स स्पर्धेत महिलांमध्ये ४०० मीटर धावण्यात नेहा ढबालेने ५७.०६ अशी वेळ नोंदवित सुवर्णपदक प्राप्त केले होते. शिवाय महिला गटात नेहा ढबालेने सर्वोत्कृष्ट ॲथलिट्स होण्याचा मान देखील मिळविला होता. या स्पर्धेत काही वेळेच्या फरकाने नेहाचे सुवर्णपदक हुकले. सुवर्णपदक कन्नूर विद्यापीठाच्या डेलना फिलीपने तर कांस्यपदक शिवाजी विद्यापीठाच्या अनुष्का दत्तात्रयने प्राप्त केले.

पुरुष गटात १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आदर्श भुरेने कांस्यपदक प्राप्त केले. आदर्शने १२.३९ अशी वेळ दिली. सुवर्णपदक १०.५४ अशी वेळ नोंदवित चंदीगढ विद्यापीठाच्या गुरविंदर सिंगने तर रौप्यपदक कॅलिकट विद्यापीठाच्या अजिथ जॉनने ११.२२ अशी वेळ देत प्राप्त केले. राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत आदर्श भुरेने १०० व २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक प्राप्त केले होते. १०० मीटरमध्ये आदर्शने १०.८३ अशी वेळ नोंदविली होती. मात्र, खेलो इंडियात आदर्शला कांस्यपदकावरच समाधान मानावे लागले. नेहा ढबाले ही प्राचार्य अरुणराव कलोडे महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून आदर्श भुरे हा आर. जी. भोयर कॉलेज सेलू चा विद्यार्थी आहे. डॉ. व्ही. एन. सिंग यांच्या अध्यक्षतेत गठीत झालेल्या डॉ. आदित्य सोनी, डॉ. अविनाश सहारे, डॉ. अरुणा थुल यांनी ॲथलेटिक्स संघाची निवड केली. नेहा ही डॉ. ब्रिजमोहन रावत यांच्या तर आदर्श माजी आंतरराष्ट्रीय पदक विजेते रितेश आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात.खेळाडूंनी मिळविलेल्या पदकाबद्दल नागपूर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी आनंद व्यक्त केला आहे. तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.



# शासकीय विज्ञान संस्थेत इंडक्शन कार्यक्रम समुदाय आधारित आंतरविद्याशाखीय दृष्टीकोनातून आयोजन

स्थानिक शासकीय ज्ञान संस्थेत समुदाय आधारित आंतरविद्याशाखीय दृष्टीकोनातून "रिचिंग टू अनरीच्ड" इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, डीन आर अँड डी, टीजीपीसीईटी नागपूरचे डॉ. नरेंद्र चौधरी, अध्यक्षस्थानी प्राणीशास्त्र विभागाचे (आयओएस) प्रमुख डॉ. के.जी.पाटील होते. विविध अभ्यासक्रमातील सुमारे साठ विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. आपल्या प्रेरणादायी भाषणात अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी विद्यार्थ्यांना समाज सेवेद्वारे "रिचिंग टू अनरिच्ड" या विषयावर कश्या प्रकारे काम करता येते, याबाबत माहिती दिली. नवीन ज्ञान निर्मिती व शाश्वत वाढीसाठी आंतर विद्याशाखीय अभ्यासक्रमातून समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी भरीव काम करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. प्रेरीत होण्यासाठी आपण आनंदी असायला हवे, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

डॉ. नरेंद्र चौधरी यांचे तांत्रिक सत्र विद्यार्थ्यांच्या करिअरला आकार देण्यासाठी खूप उपयुक्त होते. या संपूर्ण तांत्रिक सत्रात, प्रत्येक विद्यार्थ्याने अभ्यासक्रम आणि संशोधन याविषयी विस्तृत चर्चासत्रात आपली मते मांडून योगदान दिले. कामगार दलातील तरुणांना भेडसावणाऱ्या समस्यांवर प्रकाश टाकून त्यांनी त्यांच्या शंकांचे निरसन केले. चर्चासत्रात "विकाशित भारत २०४७ आणि लोकसंख्या लाभांश" या विषयी साधक बाधक चर्चा करण्यात आली. पुढील काळात येणारया 'संधी आणि आव्हाने' यावर आंतरविद्याशाखीय विद्या शाखा दृष्टिकोणातुन कसे निरसन केले जाऊ शकते, यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. के. जी. पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात दोन्ही सत्रांचा सखोल आढावा घेतला. विद्यार्थ्यांना या प्रकारच्या आंतरविद्याशाखीय शिक्षणात भाग घेण्याचे आवाहन केले. प्रो. सर्वेश्वर कासारला यांनी कार्यक्रमाच्या उद्‌घाटनपर भाषणात विद्यार्थ्यांना केस स्टडी आणि आजच्या तरुणांसाठी त्यांचे मूल्य याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शासकीय विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. जयराम खोब्रागडे, अंशुल पटले व सृष्टी बोरकर यांनी परिश्रम घेतले.

# कुस्तीमध्ये विद्यापीठाच्या प्रमोद कुमारला रौप्यपदक

## खेलो इंडिया विद्यापीठ गेम्स




नागालँड येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियम, कोहिमा येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या प्रमोद कुमारने रौप्यपदक प्राप्त केले. स्पर्धेत वरिष्ठ पुरुषांच्या ७० किलो वजन गटात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा तसेच ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रमोद कुमारने २० गुण घेत दुसऱ्या स्थानासह रौप्यपदक मिळविले. सुवर्णपदक २५ गुणांसह राणी चन्नमा विद्यापीठ कर्नाटकाच्या महेशकुमार लंगोतीने आणि कांस्यपदक चंदीगढ विद्यापीठाच्या विशालने १५ गुणांसह प्राप्त केले. प्रमोदने प्रशिक्षक निलेश राउत यांच्या मार्गदर्शनात हे यश प्राप्त केले. कुस्तीच्या संघाची निवड डॉ. एस. आर. तिवारी यांच्या अध्यक्षतेत गठीत करण्यात आलेल्या डॉ. प्रवीण पाटील, डॉ. शरद बाकडे, डॉ. सोनाली बांद्रे यांच्या समितीने केली

**जलतरण स्पर्धा :** जलतरण स्पर्धेत १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या यश गुल्हानेने पाचवे स्थान प्राप्त केले. यशने १ मि. ७.३२ अशी वेळ नोंदविली. तर ५० मीटर फ्री स्टाईल प्रकारात विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या रिद्धी परमारने सातवे स्थान प्राप्त केले. ४ बाय २०० मीटर फ्री स्टाईल प्रकारात स्नेहल जोशी, अक्षता झाडे, रिद्धी परमार, संजना जोशी यांचा समावेश असणाऱ्या विद्यापीठ संघाने सहावे स्थान प्राप्त केले. विद्यापीठाच्या खेळाडूंनी केलेल्या कामगिरीबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले आहे. तर नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी खेळाडूंचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाची आगेकूच पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धा

दमदार फलंदाजी आणि गोलंदाजीच्या जोरावर जळगाव येथे सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने सलग तिसरा विजय नोंदवित स्पर्धेत विजयी आगेकूच कायम ठेवली आहे.

जळगाव येथील एकलव्य क्रीडा संकुल एमजे कॉलेज येथे शनिवारी झालेल्या लढतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघाने एचएसएनसी संघाचा ५ गडी राखून स्पर्धेत तिसऱ्या विजयाची नोंद केली. सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या एचएसएनसी संघाने निर्धारीत १८ षटकांत सात बाद ९८ धावा उभारल्या. फलंदाजीत सर्वाधिक ३६ धावांचे योगदान सलामीवीर अम्रित हारीनद्राननेे दिले. गोलंदाजीत हर्षित बावनेने दोन गडी बाद केले. विजयी लक्ष्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने पाच गडी गमवित १५ षटकातच पूर्ण केले. फलंदाजीत सर्वाधिक ४३ धावांचे योगदान अनिरुद्ध चौधरीने दिले. तर २६ धावा सिद्धार्थ कापरेने केल्या. गोलंदाजीत शंतनू कदमने दोन गडी बाद केले.

स्पर्धेत पहिल्या लढतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने सुरतच्या सार्वजनिक विद्यापीठाचा १० धावांनी पराभव केला. सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघाने निर्धारीत २० षटकांत पाच बाद १४३ धावसंख्या उभारली. सर्वाधिक ४४ धावांचे योगदान सिद्धार्थ कापरेने तर नाबाद ३५ धावा अलोक वाडकरने केल्या. प्रत्युत्तरात सुरतचा संघ १९.५ षटकांत सर्वबाद १३३ धावसंख्याच उभारु शकला. गोलंदाजीत कौस्तुभ साळवेने चार तर शंतनु चिखलेने तीन गडी बाद करीत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. दुसऱ्या लढतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने अहमदाबादच्या लोक जागृती केंद्र विद्यापीठाचा दहा गडी राखून पराभव केला. सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या लोकजागृती संघाने निर्धारीत २० षटकांत ८ बाद ९९ धावसंख्या उभारली. गोलंदाजीत कौस्तुभ साळवेने तीन तर हर्षित बावनेने दोन गडी बाद केले. प्रत्युत्तरात विजयी लक्ष सलामीवीर कर्णधार अनिरुद्ध चौधरी याच्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने बिनबाद सहजच पूर्ण केले. फलंदाजीत अनिरुद्धने नाबाद ५२ तर सिद्धेश कानतोडेने नाबाद ४१ धावांचे योगदान दिले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघाचे प्रशिक्षक डॉ. प्रशांत बांबल आणि व्यवस्थापक डॉ. बबलू श्रीगिरवार यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी हे यश मिळविले. विद्यापीठाच्या क्रिकेटपटूंनी केलेल्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करीत स्पर्धेतील जेतेपद प्राप्त करण्याच्या दृष्टीने या संघाने प्रयत्न करावे अशी सदिच्छा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी व्यक्त केली.



# ऋतु राजांची पंचमी म्हणजेच वसंतपंचमी डॉ. सुचिता दलाल यांचे प्रतिपादन

सहा ऋतूंपैकी वसंत ऋतू हा अन्य ऋतूचा राजा असतो, म्हणून त्यास ऋतुराज म्हटले जाते. या ऋतूत वसंत पंचमीला अत्यंत महत्त्व असल्याचे प्रतिपादन स्नातकोत्तर संस्कृत विभाग प्रमुख डॉ. सुचिता दलाल यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संस्कृत विभागात वसंतपंचमी कार्यक्रम पार पडला. यावेळी डॉ. दलाल मार्गदर्शन करीत होत्या.

वसंतपंचमीची पूजा परंपरेने करण्यात येते. या दिवशी सरस्वती, कामदेव व विष्णू यांना मान दिला जातो. सरस्वतीचे पूजन करून शिकविण्यास लेखणीने प्रारंभ केला जातो, असाही उल्लेख आढळतो. संपूर्ण भारतात वसंतपंचमी अत्यंत उत्साहाने साजरी करण्यात येते. 'स्वप्नवासवदत्तम्' या नाटकात 'वसन्ती' नामक लतेचा उल्लेख आढळतो, असे डॉ. दलाल पुढे बोलताना म्हणाल्या. वसंतपंचमीच्या दिवशी पिवळे वस्त्र, फळे-फुले इत्यादी वापरण्यात येतात. वसंतपंचमी नंतर 'वसन्तोत्सव' साजरा करण्यात येतो. वसंतपंचमीला मदन व रतिला ही मान देण्यात येतो. म्हणूनच वसन्तोत्सवास मदनोत्सव म्हटल्या जाते. 'या कुन्देन्दुतुषारहारधवला' या स्तोताने कार्यक्रमास प्रारंभ करून हार घालून व पिवळ्या रंगाची फुल वाहून सरस्वतीचे पूजन करण्यात आले. यावेळेस डॉ. तनुजा वाघमारे, प्रा. हर्षदा पात्रीकर, कल्पना सराटे, जगदीश आत्राम उपस्थित होते.



# एमबीए विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचे धडे

## अकॅडमीक इंटरफेस प्रोग्राममधून सिस्टीम अप्लिकेशन अँड प्रॉडक्ट इन डेटा प्रोसेसिंगची माहिती

'सिस्टीम अप्लिकेशन अँड प्रोडक्ट इन डेटा प्रोसेसिंग' या नवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी म्हणून एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाचा रोजगार व प्रशिक्षण विभाग आणि टीसीएस मिहान नागपूर यांच्या वतीने अंबाझरी रोडवरील विद्यापीठाच्या गुरुनानक भवन येथे शनिवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ रोजी ही कार्यशाळा पार पडली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली या तीनही विद्यापीठातील एमबीए मधील एकूण १३८ विद्यार्थी उपस्थित होते. अकॅडमी इंटरफेस प्रोग्राम अंतर्गत या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. इआरपी एसएपी (एफआयसीओ) आणि एसएसपी (एसडी) या मॉड्युलचा वापर बँकिंग, अकाउंट, इन्शुरन्स तसेच फायनान्स क्षेत्रामध्ये केल्या जात आहे. या नवीन मॉडेल्स बाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी या उद्देशाने ही कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेमध्ये अकॅडमी इंटरफेस प्रोग्रामचे रिजनल हेड श्री. सौरभ लखोटे, जपान ऑपरेशन अकाउंट हेड श्री. आशिष लापलीकर, एसएपी (एफआयसीओ) तज्ञ श्री मनीष वाडकर, एसएसपी (एसडी) तज्ञ प्रियंका तिवारी, विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या कार्यशाळे करिता एकूण ३१८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. तीन विद्यापीठातील एमबीएच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविल्याने कार्यशाळेला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी अनिकेत गभणे, योगेश व्यास यांनी सहकार्य केले.






# विवेक- भावनांचा सुरेख मेळ 'मनाचिये द्वारी'

## शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने विद्यापीठाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने (काव्य आणि मानसशास्त्र यांचा लपंडाव) 'मनाचिये द्वारी' हा कार्यक्रम सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडला. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमात श्री. मिलिंद देशपांडे, डॉ. मिलिंद आपटे व लक्षती काजळकर (भुसारी) यांनी या कार्यक्रमाचे सादरीकरण केले.

उद्घाटन या कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. राजू हिवसे, श्री. मिलिंद देशपांडे, डॉ. मिलिंद आपटे व लक्षती काजळकर (भुसारी) यांची उपस्थिती होती. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून नातेसंबंधातील तसेच कौटुंबिक नात्यातील क्लिष्टता कशाप्रकारे सोडवायची याचे सादरीकरण 'मनाचिये द्वारी' या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले. श्री मिलिंद देशपांडे यांनी कविता सादर करायची. लक्षिता काजळकर (भुसारी) यांनी प्रसंगानुरूप गायन करावे तर डॉ. मिलिंद आपटे यांनी परस्पर संबंधातील निर्माण झालेली क्लिष्टता मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून सोडविण्याबाबत सल्ला द्यायचा, असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते. पुरुष व स्त्री यांच्या तारुण्य ते वृद्धापकाळतील आयुष्यादरम्यान येणाऱ्या विविध प्रसंगाचे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून सुंदर असे विवेचन या कार्यक्रमातून करण्यात आले. प्रेम विवाह झालेल्या तरुण-तरुणी दरम्यान लग्नापूर्वी चांगला सुसंवाद राहतो. मात्र, लग्न झाल्यानंतर त्यांच्या दरम्यान गैरसमज निर्माण होतात. त्याचप्रमाणे समाजातील वाढती घटस्फोटाची प्रकरणे लक्षात घेता पती-पत्नी दोघांनाही योग्य समुपदेशनाची गरज असल्याचे कार्यक्रमाच्या माध्यमातून डॉ. मिलिंद आपटे यांनी निदर्शनास आणून दिले.

मुलांची जडणघडण करताना योग्य संस्कार करण्याची जबाबदारी आई-वडिलांवर असते. मात्र, त्यांच्याच दरम्यान वाद होत असेल तर मुलांवर काय संस्कार होणार याकडे त्यांनी लक्ष वेधले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शिरीष वैद्य यांनी ३५ वर्षानंतर एकत्र आलेल्या मित्रांनी या कार्यक्रमाची आखणी केल्याचे सांगितले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सहजीवनाचा नवीन अर्थ उलगडणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री प्रदीप बिनीवाले यांच्यासह विविध विभागांचे विभाग प्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.











# 'जॉब उत्सव'ला विद्यार्थिनींचा उस्फूर्त प्रतिसाद

## निरंतर प्रयत्नांनीच जीवनात यश - डॉ. संजय दुधे

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने नांदी फाउंडेशनच्या सहकार्याने महाराज बाग स्थित दीक्षांत सभागृहात मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित 'जॉब उत्सव'ला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विदर्भाच्या विविध भागातील तब्बल १७०० पेक्षा अधिक विद्यार्थिनींनी नोंदणी केली होती. 'जॉब उत्सव'चे उद्‌घाटन करताना माननीय प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना निरंतर प्रयत्नांनीच जीवनात यश मिळत असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाला माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे, नांदी फाउंडेशनच्या प्रादेशिक प्रमुख श्रीमती सीमा भागवत, विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांची उपस्थिती होती. जॉब उत्सवमध्ये सहभागी विद्यार्थिनींना शुभेच्छा देत डॉ. दुधे यांनी विद्यापीठाच्या वतीने रोजगार देणारे कार्यक्रम राबविले जात असल्याचे सांगितले. विद्यार्थी प्राविण्य प्राप्त करतात. हुशार असतात, मात्र, नोकरी मिळविताना आवश्यक असलेल्या व्यक्तिमत्वाचा अभाव दिसून येतो. नांदी फाउंडेशन हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास सोबतच रोजगार मिळवून देण्याचे देखील काम करते. हातामध्ये पदवी असते. मात्र, जायचे कुठे हा मार्ग विद्यार्थ्यांकडे नसतो. त्यामुळे अशा कार्यक्रमांमध्ये सहभागी झाल्यास भीती नाहीसी होते. रोजगाराची संधी मिळते. शंभरावे वर्ष पूर्ण झाल्याने विद्यापीठाने कला, वाणिज्य, विज्ञान या पारंपारिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळावे म्हणून रोजगार व प्रशिक्षण सेल सुरू केल्याचे दुधे यांनी सांगितले. या रोजगार मेळाव्यात सहभागी विद्यार्थी, कंपन्या यांचे दुधे यांनी अभिनंदन केले.

यावेळी मार्गदर्शन करताना नांदी फाउंडेशनच्या सीमा भागवत यांनी विद्यार्थिनींसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन केल्याने विद्यापीठाचे आभार मानले. सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तर विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींचे स्वागत केले. प्रास्ताविक करताना रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांनी महिंद्रा कंपनीच्या सीएसआर फंडातून नांदी फाउंडेशनच्या वतीने या मेळाव्याचे आयोजन केल्याचे सांगितले. विद्यार्थिनींना रोजगार प्राप्त व्हावा म्हणून नांदी फाउंडेशनच्या वतीने सॉफ्ट स्किल कोर्सेस चालविले जाते. याचा विद्यार्थिनींनी लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन श्री. प्रमोद देशमुख यांनी केले.

### ३२ कंपन्यांचा सहभाग

नंदी फाउंडेशनच्या सहकार्याने रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने आयोजित जॉब उत्सव मध्ये तब्बल ३२ कंपन्यांनी सहभाग घेतला. यामध्ये ओप्पो इंडिया, डिअर सर, पिरामल फायनान्स, एसआरइ एमफ्लिक्स, बैद्यनाथ आयुर्वेद प्रायव्हेट लिमिटेड, स्टॉप कॅन्सर मिशन, महिंद्रा, एम्प्रेस मॉल, सन फार्मा, स्पीक अँड स्पॅन सर्विस, कास्तकार एजन्सीज, प्रणाम क्रिएटिव्ह सोल्युशन, मायक्रो-प्रो सॉफ्टवेअर सोल्युशन लिमिटेड, आदित्य मोटर्स, मंक स्टफिंग, हेडस्टार्ट, पार्टीनेन्ट, टीसीएस, स्वतंत्र मायक्रो फिन, तनिष्क नागपूर स्वामीनारायण स्कूल, हेक्झावेअर ॲक्सिस बँक, 'आदिफिडेलिस' सोलुशन प्रायव्हेट लिमिटेड, इलाईट असोसिएट्स, टाटा ऑटो कॉम सिस्टीम, मिंडा कार्पोरेशन ग्रुप, ब्रिटानिया इंडस्ट्रीज, ॲप्टिव्ह कार्पोरेशन इंडिया प्रा.लि., अशफा ग्लोबल सर्विस प्रा. लि., एचआर आयएनएनव्ही फॅसिलिटीर व ॲव्हेस्टन टेक्नॉलॉजी कंपन्यांचा सहभाग होता.



# मराठी भाषेचा गौरव 'कुसुमाग्रज' - डॉ. शैलेन्द्र लेंडे

## मराठी, हिंदी विभागात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

मराठी ही भारतातील प्राचीन भाषा आहे. संत- सुधारकांनी साहित्यातून या भाषेला समृद्ध केले आहे. विष्णू वामन शिरवाडकर 'कुसुमाग्रज' यांनी मराठीला साहित्यिक व भाषिक दृष्टीने व्यवस्थित आणि पोषित करण्याचे महान कार्य केले आहे. त्यामुळे 'कुसुमाग्रज' यांना मराठी भाषेच्या गौरवाचे प्रतीक मानले जाते, असे प्रतिपादन मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा मराठी व हिंदी विभाग तसेच शिक्षा संस्कृती उत्थान न्यास विदर्भ प्रांत यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिवसाचा कार्यक्रम मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडला. यावेळी डॉ. लेंडे मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे होते. प्रमुख अतिथी म्हणून मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे, डॉ. संतोष गिन्हे, डॉ. अमृता इंदूरकर यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी कुसुमाग्रजांनी त्यांच्या साहित्यिक कृतीतून मराठी भाषेला अलंकृत केल्याचे सांगितले. कार्यक्रमाची अध्यक्षता करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी कुसुमाग्रज हे मराठी भाषेला गौरवान्वित करणारे श्रेष्ठ लेखक होते असे सांगितले. एका साहित्यिकाची जयंती भाषा विशेष गौरव दिवसाच्या रूपात साजरी होत असेल हे त्या भाषा- भाषिक समाजाकरिता गौरवाची बाब आहे. यातून कुसुमाग्रज यांचे कार्य आणि त्यांच्या योगदानाचा परिचय होतो, असे डॉ. पांडे म्हणाले.

सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिन्हे यांनी कुसुमाग्रज यांचे साहित्य मराठी भाषेची अस्मिता आहे. भाषेला संवर्धित करणारी महान साहित्यकारांची प्रदीर्घ परंपरा आपणास मराठी साहित्यात मिळत असल्याचे सांगितले. मराठी विभागातील प्राध्यापिका डॉ. अमृता इंदूरकर यांनी कुसुमाग्रज यांचे साहित्य भारतीय भाषांचा सेतुबंध आहे, असे सांगितले. मराठी भाषा अभिजात भाषा असून अन्य भाषिक देखील मराठी साहित्य वाचण्यात रूची दाखवीत असल्याचे पुढे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. दामोदर द्विवेदी यांनी केले तर आभार मराठी विभागातील प्रा. हर्षल गेडाम यांनी मानले. यावेळी डॉ. लखेश्वर चंद्रवंशी, डॉ. सुमित सिंह, डॉ. कुंजनलाल लिल्हारे, डॉ. एकादशी जैतवार, प्रा. जागृति सिंह, आकांक्षा बांगर, प्रा. अमित सहित हिन्दी, मराठी विभागातील संशोधक, विद्यार्थी



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कॉर्फबॉल संघाची घोषणा

## अ.भा. आंतरविद्यापीठ स्पर्धा

चेन्नई, वंदालुर येथील बीएस अब्दुर रेहमान इन्स्टि. ऑफ सायंस अँड टेक्नॉलॉजी यांच्या यजमानपदाखाली १ ते ५ मार्च दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मिश्र कॉर्फबॉल स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला-पुरुष संघाची घोषणा करण्यात आली आहे.

विद्यापीठाचा संघ पुढीलप्रमाणे- तुषार ठोंबरे, यश कापटे (जीएस कॉमर्स कॉलेज वर्धा), नीलेश साखरकर, यश टांक (धनवटे नॅशनल कॉलेज), दीप बिल्लोरे (एनएमडी कॉलेज गोंदिया), अक्षय नैताम (डॉ. हरीभाऊ आदमने कॉलेज), हिमांशु निठरवाल, दिनेश भोजराम (डीबीएम कॉलेज, गोंदिया), यामिनी ढगे, कृतिका पिसे(जीएस कॉमर्स कॉलेज, वर्धा), माहेश्वरी माखरे, सेजल मिरासे (धनवटे नॅशनल कॉलेज), खुशबु मांडवे (एनएमडी कॉलेज गोंदिया), माया दुकिया (डीबीएम कॉलेज गोंदिया), वेदांती वाकुलकर (शिवाजी सायंस कॉलेज), मनस्वी ढेपे (यशोदा गर्ल्स कॉलेज). राखीव खेळाडू- मयंक गायकवाड, तुषार वैरागडे (धनवटे नॅशनल कॉलेज), अक्षय भलावी (एमजी कॉलेज), फरहान मंसुरी (अंजुमन कॉलेज अभियांत्रिकी), प्रशित वाहले (शिवाजी सायंस विद्यालय), निकीता लोमरोर (डीबीएम कॉलेज गोंदिया), खुशाली मेश्राम (धनवटे नॅशनल कॉलेज), इशिका बावने (डॉ. आदमने कॉलेज), आलिया आर्शिया (अंजुमन अभियांत्रिकी महाविद्यालय), प्राजक्ता भोगे (एमजी कॉलेज, पारशिवनी). प्रशिक्षक- अपेक्षा उखुरे, व्यवस्थापक- डॉ. लालचंद पारखी.




# शाश्वत विकासाचे विचार लोकांमध्ये रुजविणे गरजेचे

## राष्ट्रीय विज्ञान दिवसाच्या कार्यक्रमात प्र कुलगुरु डॉ.संजय दुधे यांचे प्रतिपादन

शाश्वत भविष्यासाठी लोकांमध्ये शाश्वत विकासाचे विचार रुजविणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या सन्मानार्थ राष्ट्रीय विज्ञान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विज्ञान महोत्सवाचा उद्घाटनिय कार्यक्रम रसायनशास्त्र विभागाच्या सभागृहात मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०१४ रोजी पार पडला. 'शाश्वत भविष्यासाठी विज्ञान' विषयावर आयोजित विज्ञान महोत्सवात डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

आभासी पद्धतीने सीएसआयआर- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोलियम देहरादूनचे संचालक डॉ. हरेदरसिंह बीस्ट, मंचावर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, आयआयएल संचालक डॉ. राजेश सिंह, आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, महोत्सवाचे समन्वयक डॉ. राजेंद्र डोंगरे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी G-20 मध्ये झालेल्या चर्चेनुसार जागतिक विकासात भर दिला जात आहे. यावेळी आभासी पद्धतीने मार्गदर्शन करताना सीएसआयआर- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोलियम देहरादूनचे संचालक डॉ. हरेदरसिंह बीस्ट यांनी 'शाश्वत ऊर्जा व पर्यावरण' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. जगातील कार्बन उत्सर्जन कमी करायचे असेल तर जैव इंधन शिवाय पर्याय नाही. सस्टेनेबल एव्हिएशन फ्युल आणि बायो फ्युलच्या वापरामुळे वातावरणातील कार्बन उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल, असे डॉ. हरेंदर सिंह म्हणाले. या सोबतच भारत हा मोठ्या प्रमाणात जैव वायू निर्मिती होणारा देश आहे. भविष्यात जैव इंधनाची निर्मिती आणि वापरावर अधिक भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. प्लास्टिकचा पुनर्वापर करीत विविध सामाजिक गरजा कशा पूर्ण करता येईल, संशोधनाच्या दृष्टीने यावर लक्ष देण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविक महोत्सवाचे समन्वयक डॉ. राजेंद्र डोंगरे यांनी केले. आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांनी अहवाल सादर केला. आयआयएल संचालक डॉ. राजेश सिंह यांनी देखील मार्गदर्शन केले. औषधी निर्माण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर, गणित विभाग प्रमुख डॉ. गणेश केदार यांनी सादरीकरण केले. उद्घाटनिय कार्यक्रमाचे संचालन अमृता रूपचंदानी व युक्ती पटेल या विद्यार्थिनींनी केले तर आभार डॉ. स्मिता आचार्य यांनी मानले. दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजनभारतातील वैज्ञानिक यश, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा, भारत का अमृतकाल विकसित भारत २०४७ या विषयावर वॉल पेंटिंग स्पर्धा होत आहे. या स्पर्धेचे समन्वयक डॉ. समया हुमणे, डॉ. संयुक्ता थोरात आहेत. स्वयंस्फूर्त भाषण स्पर्धा आयोजित असून त्याचे समन्वयक म्हणून डॉ. रिता वडेटवार व डॉ. राजेंद्र डोंगरे आहेत. हवामान बदल, संसाधन कमी होणे, पर्यावरणाचा ऱ्हास आणि शाश्वत विकास या विषयावर डॉक्युमेंटरी मेकिंग स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेचे समन्वयक डॉ. शालिनी लिहितकर व डॉ. विना बेलगमवार आहेत. दुसऱ्या दिवशी बुधवार दिनांक २८ फेब्रुवारीला विद्यार्थ्यांचा सारांश स्पर्धा होणार असून याचे समन्वयक डॉ. नितीन डोंगरवार, डॉ. मंगला हिरवाडे व डॉ. उमेश पलीकुंडवार आहेत. विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा होणार असून त्याचे समन्वयक डॉ. विजय तांगडे व डॉ. रिता वडेतवार आहेत. विज्ञान महोत्सवाच्या आयोजनाकरिता आयआयएल संचालक डॉ. राजेश सिंह, आयक्यूएसी समन्वयक डॉ. स्मिता आचार्य, डॉ. राजेंद्र डोंगरे, डॉ. नंदकिशोर करडे, डॉ. रवीन जुगादे, डॉ. विजय तांगडे, डॉ. अपर्णा समुद्र,डॉ.पायल ठावरे, डॉ. धीरज कदम,डॉ. समित माहुरे प्रयत्नरत आहे.



## विद्यापीठात मराठी भाषा दिवस उत्साहात

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन मराठी भाषा दिवस म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भावनातील सभागृहात मंगळवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी हा कार्यक्रम पार पडला.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांच्या शुभहस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला हारार्पण करण्यात आले. यावेळी शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री. प्रदीप बिनीवाले, सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री. गणेश कुमकुमवार, युडीसी शैलेश राठोड, मनोज मोरे, नितीन खरबडे, प्रभाकर गेडाम, मोरेश्वर उमरेडकर, अनिल खरे, कवडू भोयर, रुपेश आतराम, प्रकाश कुंजाम, कार्तिक हरडे, प्रदीप झोडे यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.






## 'तेरवं'ने मांडला स्त्रियांचा संघर्ष - डॉ. संजय दुधे

### ललित कला विभागात चित्रपटाचा प्रीमियर टॉक शो

'तेरवं' या चित्रपटाने स्त्रियांचा संघर्ष समाजासमोर आणण्याचा प्रयत्न केल्याचे प्रतिपादन माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा स्त्रियांचा संघर्ष दिग्दर्शक हरीश इथापे यांनी 'तेरवं' या चित्रपटातून समोर आणली आहे. या चित्रपटाचा प्रीमियर टॉक-शो राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभागात शनिवार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडला. यावेळी डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी या प्रसंगी विद्यार्थ्यांशी सवांद साधला आणि चित्रपटाच्या संपूर्ण टीम ला पुढील वाटचालीसाठी शुभेच्या दिल्या. या चित्रपटाचा उत्सव साजरा करण्यासाठी ललित कला विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांच्या संकल्पनेतून प्रोमो टॉक शो चे आयोजन करण्यात आले. 'स्त्री सशक्तीकरण' हा हल्लीच्या चित्रपट निर्मात्यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. मात्र, असे फार कमी चित्रपट असतात, ज्यामध्ये स्त्री जीवनाची खरी व्यथा आणि खरी कथा प्रभावीपणे मांडली जाते. नशा, क्लब, पार्ट्या, वैभिचार या सर्व प्रकारांचा वापर करून भडक स्त्री मुक्तीचे ढोंग लोकांपुढे मांडणारे आणि दिखावा करणारे ढीगभर चित्रपट बाजारात येतात. या प्रदुषित वातावरणात हळूच कुठून तरी वाऱ्याची एक मंद झुळूक यावी आणि मनाला आल्हाद देऊन जावी, अशी एक कलाकृती पुढील काही दिवसात आपल्या भेटीला येत आहे. 'तेरवं' हे या कलाकृतीचं नाव. तसा 'तेरवं' हा चित्रपट सध्या अनेक कारणांनी चर्चेचा विषय ठरत आहे. चित्रपटाची कथा आणि विषय फार सुंदर आहे.



आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा स्त्रियांचा संघर्ष संपूर्ण ताकदीनिशी पडद्यावर मांडतांना दिग्दर्शक हरीश इथापे यांनी चित्रपटाच्या कुठल्याही तांत्रिक बाजूशी तडजोड केलेली नाही, हे आपणास ट्रेलर पाहतांनाच लक्षात येते. या शिवाय या चित्रपटाची संहिता श्याम पेटकर सारख्या अनुभवी लेखकाच्या लेखणीतून उतरली असल्यामुळे हा चित्रपट व्यावसायिक दृष्ट्या देखील यशस्वी होणार यात शंका नाही. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन विजय जथे यांनी केले. या कार्यक्रमात तेरवं ची संपूर्ण टीम उपस्थित होती.





# पथनाट्यातून थोर पुरुषांचे विचार समाजात पोहोचवा

## प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे यांचे प्रतिपादन

### आंतर महाविद्यालयीन पथनाट्य स्पर्धा - नागपूर जिल्ह्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय प्रथम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व महात्मा गांधी यांनी त्यांच्या विचारातून ग्राम विकासाची संकल्पना मांडली आहे. शाश्वत विकासाकडे नेणारे थोर पुरुषांचे विचार समाजात पथनाट्यातून पोहोचवा असे प्रतिपादन माननीय प्र-कुलगुरू डॉ संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सव अंतर्गत आंतर महाविद्यालयीन पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्र, गांधी विचारधारा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पथनाट्य स्पर्धेचे उद्घाटन बुधवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी गांधी विचारधारा विभाग येथे पार पडले. यावेळी डॉ. दुधे मार्गदर्शन करत होते. प्राथमिक फेरीत नागपूर जिल्ह्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या पथकाने प्रथम क्रमांक पटकावला.

'महात्मा गांधी व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रामोद्धाराची कल्पना व आजचा युवक' या विषयावर आयोजित पथनाट्य स्पर्धेतील नागपूर जिल्हा आंतर महाविद्यालयीन प्राथमिक फेरीच्या उद्घाटन समारंभाला माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, महात्मा गांधी विचारधारा विभाग प्रमुख श्री. प्रमोद वाटकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. सोपानदेव पिसे, परीक्षक डॉ. संजय पेंडसे, श्री पियुष धुमकेकर यांची उपस्थिती होती. राष्ट्रसंतांचे नाव विद्यापीठाला असून येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन, महात्मा गांधी विचारधारा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग, चक्रधर स्वामी अध्यासन असून त्यांचे विचार शिकविल्या जाते. मात्र, त्यानंतर देखील समाजात अनेक गोष्टी दिसून येते. समाजाचा विकास कोणत्या दिशेने होत आहे. पारंपारिक विचार नष्ट होत आहे. काहीतरी दिशा चुकल्यासारखे वाटते. संतांच्या विचाराप्रमाणे आपण वागतो का ? याचे आत्ममंथन करण्याची गरज प्र-कुलगुरु डॉ. दुधे यांनी पुढे बोलताना व्यक्त केली. महात्मा गांधी व राष्ट्रसंत यांनी त्यांच्या विचारातून 'गाव समृद्ध तर राष्ट्र समृद्ध' अशी ग्राम विकासाची संकल्पना मांडली आहे. चांगल्या भविष्यासाठी शाश्वत विकासाच्या दृष्टीने थोर पुरुषांचे विचार पथनाट्याच्या माध्यमातून पोहोचवा असे आवाहन डॉ. दुधे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना पथनाट्य स्पर्धेचे आयोजनामागील माहिती श्री. प्रमोद वाटकर यांनी दिली. संत हे द्रष्टे पुरुष असतात. समाजाला कोणत्या दिशेने न्यायचे आहे, याची दिशा ते देतात. त्यामुळेच महात्मा गांधी व राष्ट्रसंतांनी गावांना समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे अनुयायी देखील हा वारसा पुढे नेत असल्याचे श्री. वाटकर यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन श्रद्धा भारद्वाज यांनी केले.

**१२ महाविद्यालयांचा सहभाग**

नागपूर जिल्ह्यासाठी झालेल्या प्राथमिक फेरीत एकूण १२ महाविद्यालयातील पथकांनी पथनाट्य स्पर्धेत सहभाग नोंदविला. यात प्रथम क्रमांक डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय नागपूर, द्वितीय क्रमांक जवाहरलाल नेहरू कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाडी तर तृतीय क्रमांक नवप्रतिभा वरिष्ठ महाविद्यालय नागपूरने पटकावला. स्पर्धेचे पुरस्कार वितरण माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे व आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांच्या शुभहस्ते करण्यात आले. स्पर्धेमध्ये जवाहरलाल नेहरू कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाडी, पीएनवीएस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवप्रतिभा वरिष्ठ महाविद्यालय नागपूर, व्हीएमव्ही कॉलेज वर्धमान नगर नागपूर, वुमन्स कॉलेज ऑफ आर्ट अँड कॉमर्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, संताजी महाविद्यालय नागपूर, विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय, हिस्लाप कॉलेज सिव्हिल लाईन नागपूर, महिला कला महाविद्यालय उमरेड, श्रीमती बिंझानी महाविद्यालय नागपूर व गांधी पदवीधर विभाग यांचा समावेश होता.

**जिल्हा स्तरावर प्राथमिक फेरी**

वर्धा जिल्ह्यासाठी शुक्रवार दिनांक १ मार्च २०२४ रोजी लोक महाविद्यालय वर्धा, भंडारा जिल्ह्यातील प्राथमिक फेरी मंगळवार दिनांक ५ मार्च रोजी जे. एम. पटेल महाविद्यालय भंडारा येथे तर गोंदिया जिल्ह्यातील प्राथमिक फेरी गुरुवार दिनांक ७ मार्च २०२४ रोजी पुंजाबाई पटेल शिक्षण महाविद्यालय गोंदिया येथे सकाळी ११ वाजता होणार आहे.





## लिखाणात सर्जनशीलता असावी - डॉ. संजय दुधे
### स्नातकोत्तर मराठी विभागात कवी संमेलन

लिखाणामध्ये सर्जनशीलता असावी, असे प्रतिपादन माननीय प्र-कुलगुरू डॉ संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने कवी संमेलनाचे आयोजन गुरुवार, दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना डॉ. दुधे बोलत होते.

कवी संमेलनाला उद्‌घाटक म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, अध्यक्षस्थानी डॉ. तीर्थराज कापगते, प्रमुख अतिथी म्हणून संजयकुमार करंदीकर, मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांची उपस्थिती होती. लिखाण संग्रहातून स्वतःचे प्रतिबिंब दिसते. कवी संमेलनातून आपली प्रतिभा जागृत होते. त्यामुळे प्रत्येकाने लिखाण केले पाहिजे, असे प्र-कुलगुरु डॉ. दुधे पुढे बोलताना म्हणाले. विदर्भातील प्रसिद्ध कवी डॉ. विठ्ठल वाघ यांचे उदाहरण देत कवीला अंतरंग मनरंग लागते, असे ते म्हणाले. कवी संमेलनात सहभागी सर्व कवींना त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी श्री. संजयकुमार करंदीकर यांनी मनोगत व्यक्त करताना मानवी संवेदनाचा सर्वात जवळचा संबंध कविता असल्याचे सांगितले. भारतीय कविता साहित्यात मराठी भाषेने कविता समृद्ध केली. कविता समृद्ध करण्यामध्ये समकालीन कवयित्रींचा देखील मोठे योगदान असल्याचे करंदीकर म्हणाले. प्रास्ताविक करताना मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने आगळावेगळा कार्यक्रम आयोजित केला असल्याचे सांगितले.

कवी संमेलनात डॉ. अजय चिकाटे (नागपूर), डॉ. भूषण रामटेके (पुलगाव), डॉ. पद्मरेखा धनकर (चंद्रपूर), सौ. जयश्री अंबासकर (नागपूर), डॉ. अमृता इंदूरकर (नागपूर), रश्मी पदवाड- मदनकर (नागपूर), मनीषा अतुल (नागपूर) आदी कवींनी त्यांच्या दर्जेदार कवितांचे सादरीकरण केले. उद्‌घाटन कार्यक्रमाचे संचालन विशाखा पवार व मंजिरी वैद्य यांनी केले. कवी संमेलनाचे अध्यक्षस्थान मनीषा अतुल भूषविले तर संचालन वर्षा थोटे यांनी केले.









## लोकांच्या सहवासातूनच मिळतो आनंद - डॉ. संजय दुधे
### विद्यापीठात सेवानिवृत्त शिक्षक, कर्मचाऱ्यांना निरोप

लोकांच्या सहवासातूनच आनंद मिळवता येत असल्याचे प्रतिपादन माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सेवानिवृत्त शिक्षक, कर्मचारी निरोप समारंभ गुरुवार दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ रोजी जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात पार पडला. यावेळी डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कलगुरु डॉ. संजय दुधे तर प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ.राजू हिवसे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना डॉ. दुधे यांनी सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक, कर्मचाऱ्यांना पुढील आयुष्य करिता शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. विद्या भारंबे यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यापीठाचे आभार मानले. प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या शुभहस्ते सेवानिवृत्त झालेले बॅरिस्टर एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक डॉ. विद्या श्रीकृष्ण भारंबे, प्रवास व पर्यटन विभागातील श्री. मिलिंद चंद्रभान रंगारी, लोकप्रशासन विभागातील श्री. अशोक रामभाऊ पाटील, मुद्रणालयातील श्री. सुभाष माधोदेव मालापुरे यांचा सहकुटुंब सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन दीपक घोडमारे यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले.



# विद्यार्थ्यांनी रेखाटले विकसित भारताचे चित्र

## विविध स्पर्धांमधून मांडला शाश्वत विकासाचा संकल्प

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विविध कार्यक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या सन्मानार्थ राष्ट्रीय विज्ञान महोत्सवाचे आयोजन मंगळवार, २७ व बुधवार २८ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले. रसायनशास्त्र विभागात आयोजित दोन दिवसीय महोत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी वॉल पेंटिंग स्पर्धेच्या माध्यमातून विकसित भारताचे चित्र रेखाटताना दिसून आले. प्रश्नमंजुषा, स्वयंस्फूर्त भाषण, पेपर प्रेझेंटेशन आदी विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी शाश्वत विकासाचा संकल्प मांडला.

राष्ट्रीय विज्ञान महोत्सवाचा समारोपीय कार्यक्रम बुधवार, दिनांक २८ फेब्रुवारी रोजी पार पडला. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, जवाहरलाल नेहरू ॲल्युमिनियम रिसर्च अँड डेव्हलपमेंट डिझाईन सेंटरचे संचालक डॉ. अनुपम अग्निहोत्री, आयक्युएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, महोत्सवाचे समन्वयक डॉ. राजेंद्र डोंगरे यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. अनुपम अग्निहोत्री यांनी विज्ञान तंत्रज्ञानातून भारत हा महासत्ता होणार असल्याचे सांगितले. पर्यावरण तसेच शाश्वत विकासाच्या दृष्टीने त्यांनी यावेळी मार्गदर्शन केले. दोन दिवस घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे पुरस्कार वितरण यावेळी करण्यात आले.

भारतातील वैज्ञानिक यश, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा, भारत का अमृतकाल विकसित भारत २०४७ या विषयावर आयोजित वॉल पेंटिंग स्पर्धेत सृष्टी मट्टे, सोनाक्षी तलांडे, सुमित वाडबुद्धे, साक्षी पाटील, अंकिता चव्हाण यांच्या टीमने प्रथम क्रमांक, चंचल नान्हे, प्रांजली भोयर, मयुरी कापसे यांच्या टीमने द्वितीय, चैतन्य गाडेकर, सागर बारापात्रे, ऋतू भायानी, अश्विनी लाडे, अमित धुर्वे यांच्या टीमने तृतीय पुरस्कार प्राप्त केला. श्रेया सहदेवकर, इत्फेशाम अंजुम, सृष्टी वाघमारे, फालगुनी सदावर्टी, नेहा निंबाळकर या टीमने आणि श्रीया लांजेवार, नक्षत्रा इंगळे, हर्षल बोकडे, हर्षल नेहरे, प्रथमेश अकुलवार यांच्या टीमने उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त केले. या स्पर्धेचे समन्वयक डॉ. समया हुमणे, डॉ. संयुक्ता थोरात होते.

'एआय तंत्रज्ञानाचा वापर करून शाश्वत विकास' या विषयावर घेण्यात आलेल्या स्वयंस्फूर्त भाषण स्पर्धेत ज्योतीरादित्य विवेक सिंह याने प्रथम, मोहम्मद शेख याने द्वितीय, अनिया शेख ने तृतीय तर ताहीर शेख व प्रिन्साली तीतरमारे ने उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त केला. या स्पर्धेचे समन्वयक डॉ. रिता वडेटवार व डॉ. राजेंद्र डोंगरे होते. हवामान बदल, संसाधन कमी होणे, पर्यावरणाचा ऱ्हास आणि शाश्वत विकास या विषयावर डॉक्युमेंटरी मेकिंग स्पर्धेत मनीषा ठाकूर व निधी शिर्के यांच्या टीमने प्रथम क्रमांक, सागर बारापात्रे याने द्वितीय क्रमांक, रोशन सिद, दीप नागदेवे, सोनाली पाल यांच्या टीमने तृतीय तर अनुज कांबळे व अक्षता पाठक यांनी उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त केला. या स्पर्धेचे समन्वयक डॉ. शालिनी लिहितकर व डॉ. विना बेलगमवार होते. प्रश्नमंजुषा स्पर्धेत लकी भुजाडे याने प्रथम, जयेश पराठे, अमन लांजेवार प्रज्वल पंधराम यांच्या टीमने द्वितीय, अनिरुद्ध चवरे, हर्ष तिवारी, प्रणव गायकवाड यांच्या टीमने तृतीय क्रमांक, संध्या राजपूत, शिवम झा, दामिनी देवते यांची टीम आणि प्रगती गौतम, नम्रता चौधरी, वैष्णवी भुरे यांच्या टीमने उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त केले. समन्वयक डॉ. विजय तांगडे व डॉ. रिता वडेतवार होते. मौखिक सादरीकरण स्पर्धेत वैभव भगत ने प्रथम क्रमांक, अर्शिया अलीने द्वितीय तर ज्ञान राजनने तृतीय क्रमांक प्राप्त केला. पेपर सादरीकरण स्पर्धेत अंकिता पांडे ने प्रथम, वैभव साबळेने द्वितीय, प्रतीक डांगे ने तृतीय, हिमांशू महाजन व होरीलाल निर्मलकर यांनी उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त केले. या स्पर्धेचे समन्वयक डॉ. नितीन डोंगरवार, डॉ. मंगला हिरवाडे व डॉ. उमेश पलीकुंडवार होते.

पहिल्या दिवशी औषधी निर्माण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर, गणित विभाग प्रमुख डॉ. गणेश केदार, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर, व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. अनंत देशमुख यांनी सादरीकरण केले. विज्ञान महोत्सवाच्या आयोजन समिती मध्ये आयआयएल संचालक डॉ. राजेश सिंह, आयक्यूएसी समन्वयक डॉ. स्मिता आचार्य, डॉ. राजेंद्र डोंगरे, डॉ. नंदकिशोर करडे, डॉ. रवीन जुगादे, डॉ. विजय तांगडे, डॉ. अपर्णा समुद्र, डॉ. पायल ठावरे, डॉ. धीरज कदम, डॉ. समित माहुरे यांचा समावेश होता. यशस्वीतेसाठी ताहीर शेख, सोनाली पाल, क्षितिज मेश्राम, अनिया शेख, विभा तातेड, अमृता रूपचंदाणी, श्रृती पवार यांनी परिश्रम घेतले.



## हवाई क्षेत्र व पर्यटन व्यवसायातील संधीबाबत कार्यशाळा

### विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील प्रवास व पर्यटन विभागात हवाई क्षेत्र व पर्यटन व्यवसायातील संधी या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन गुरुवार, दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले. प्रवास व पर्यटन विभागाचे संचालक डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

कार्यशाळेत अध्यक्षस्तरीय भाषण करताना संचालक डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी विभागाची वाटचाल आणि होत असलेल्या विकास कामाची माहिती दिली. प्रमुख वक्ता ट्रेंड्झ या पर्यटन कंपनीचे संचालक मिहीर देशपांडे यांनी इंडिगो एअर लाईन्सचा स्वतःचा अनुभव सांगितला. एअर लाईन्स व विमानतळावर कश्या प्रकारचे रोजगार असतात व तिथे कश्याप्रकारे काम चालते याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बोर्डिंग पास ते बैगेज ब्रेक अप, स्क्रीनिंग इत्यादीची माहिती विद्यार्थ्यांना त्यांनी दिली.

दुसरे प्रमुख पाहुणे फ्लाई हाई इन्स्टिट्यूट नागपूर येथील इन्स्ट्रक्टर आशुतोष रामटेके यांनी कैबिन क्रिवचा त्यांच्या प्रवास याबाबत माहिती दिली. विविध देशाला दिलेल्या भेटी याचे स्वअनुभव विद्यार्थ्यांना सांगितले. विद्यार्थ्यांना कैबिन क्रीव्ह, ग्राउंड स्टाफमध्ये काय काय संधी आहेत याबाबत मार्गदर्शन केले. तिसरे प्रमुख पाहुणे फ्लाई हाई इंस्टिट्यूट नागपूर येथे फैकल्टी अशोक भट्टाचार्य यांनी पर्यटन व्यवसायातील एकाग्रतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. त्यांचा अनुभव त्यांनी शेयर केला तसेच पर्यटन व्यवसायात ग्राउंड स्टाफमध्ये पर्यटन विद्यार्थ्यांना असलेल्या १४ प्रकारच्या नोकरीच्या संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन प्रा.मंजुषा डोंगरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. भाग्यश्री हिरादेवे, रामदास बागडे, दीपक उईके यांनी करून दिला. आभार नरेश मेश्राम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.अरविंद उपासनी, डॉ.अमरदीप बारसागडे, प्रा. शोभना मेश्राम, प्रा. परिमल सुराडकर व विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

## 'भूजल समस्या आणि व्यवस्थापन' प्रशिक्षण कार्यशाळा

### विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर भूगर्भशास्त्र विभागातील एल.जी. ग्वालानी सभागृहात 'भूजल समस्या आणि व्यवस्थापन' या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. विद्यापीठाचा भूगर्भशास्त्र विभाग, सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्ड (CGWB) मध्य क्षेत्र, नागपूर व राजीव गांधी राष्ट्रीय भूजल प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ही प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.

उद्‌घाटन कार्यक्रमाला विद्यापीठाच्या आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्डचे प्रादेशिक संचालक एन. वरदराज, भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. कीर्तीकुमार रणदिवे, डॉ. सुमेध हुमणे, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (MRSAC) नागपूरचे शास्त्रज्ञ डॉ. विवेक काळे, सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्डचे शास्त्रज्ञ निलोफर, कार्यकारी अभियंता कल्याण जाटव यांची उपस्थिती होती. प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्‌घाटन बुधवार, दिनांक १४ फेब्रुवारीला झाले तर शुक्रवार, १६ फेब्रुवारी २०२४ रोजी समारोप झाला. या प्रशिक्षण कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे भूजल संवर्धन व व्यवस्थापन आणि स्थानिक भूजल समस्यांशी संबंधित सर्व पैलूंचे मूलभूत ज्ञान प्रदान करणे, भूजल व्यवस्थापन आराखडा तयार करणे, महाराष्ट्रात त्याची अंमलबजावणी करणे, लोकसहभागाला चालना देणे हे आहेत. टियर-II कार्यक्रमात, केंद्र/राज्य सरकारचे अधिकारी, जल विकास आणि व्यवस्थापन संबंधित संस्था (NGO), शैक्षणिक संस्था इत्यादींना प्रशिक्षण देण्यात आले.

आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांनी भूजलाशी संबंधित स्थानिक समस्या आणि त्याचे व्यवस्थापन आणि पुनर्भरण यावर त्यांच्या भाषणात भर दिला. डॉ. सुमेध हुमने यांनी विद्यार्थ्यांना खोलवर बसलेल्या भूजलाशी संबंधित नवीन संशोधनाची माहिती दिली आणि त्याचा अभ्यास करण्यावर भर दिला. भविष्यात भूजल संबंधित संशोधन या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ.विवेक काळे म्हणाले की, MRSAC च्या पोर्टलवर भूजलाशी संबंधित नकाशे उपलब्ध आहेत, त्याचा फायदा भूगर्भशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी घ्यावा. एन वरदराज यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे जलप्रदूषण आणि ते सजीवांसाठी किती घातक आहे, याकडे लक्ष वेधले. सुरुवातीला निलोफर यांनी स्वागत भाषण केले आणि CGWB च्या उद्दिष्टांवर आणि प्रशिक्षण कार्यक्रमाच्या तपशीलावर बोलले. सीजीडब्ल्यूबीच्या केमिकल एक्सपर्ट डॉ. सायली भांगे यांनी सत्राचे संचालन केले. शास्त्रज्ञ अश्विनकुमार आटे, यांनी आभार मानले. भूविज्ञान विभागातील एकूण २९ विद्यार्थी आणि शिक्षकांनी या कार्यक्रमात भाग घेतला.

**लोकसत्ता** — लोकमान्य लोकशक्ती

## नागपूर विद्यापीठाचा पदके व पारितोषिके वितरण सोहळा उद्या

नागपूर येथील विद्यार्थी प्रणय आनंद पवार याने एमबीए परीक्षेत सर्वाधिक एकत्रित वर्ग गुण सरासरी प्राप्त करून ७ सुवर्णपदके प्राप्त केले आहे.

पदकांचे मानकरी

## नैतिक मूल्यांची आज खऱ्या अर्थाने गरज : डॉ. चाफले



विद्यार्थ्यांना नैतिक मूल्यांची आज खऱ्या अर्थाने गरज आहे. पर्यावरणाच्या पायाभरणासाठी ग्रामसंस्कृतीत वावरणारे विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून मोलाचा हातभार लावू शकतात, असे प्रतिपादन अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ पुरस्कृत नागपूर विद्यापीठ मंच महामंत्री डॉ. सतीश चाफले यांनी केले. सावनेर येथिल डॉ. हरिभाऊ आदमने महाविद्यालच्या नांदिखेडा या ग्रामातील राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटनीय सत्रातील प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वीरेंद्र जुमडे, सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालयाचे वाणिज्य विभागप्रमुख डॉ. तुषार चौधरी, जि.प. माजी सदस्य मनोहर कुंभारे, कार्यक्रमाधिकारी डॉ. कृष्णा राऊत, नांदिखेडा येथील सरपंच देवेंद्र बोढे, तिडंगी गावचे सरपंच रामभाऊ मारबते उपस्थित होते. जगाच्या पाठीवर खेड्यासारखे सुंदर नैसर्गिक जीवन दुर्लभ आहे, म्हणूनच महात्मा गांधीजींनी खेड्याकडे चला ... डे म्हणाले. प्रास्ताविक डॉ. कृष्णा ... प्रमोद लेंडे यांनी केले. अतिथींचे ...



## विधी महाविद्यालयातील छात्र संसदेत झळकले नेतृत्वगुण

**नागपूर** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज येथे अलिकडेच छात्र संसदेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना सांसदीय कार्यप्रणालीची माहिती व्हावी तसेच त्यांच्यातील नेतृत्व, वक्तृत्व तसेच इतर कलागुण विकसित करण्याच्या उद्देशाने हे आयोजन करण्यात आले होते. छात्र संसदेमध्ये अलीकडेच पारित झालेला भारतीय न्याय संहिता-२०२३चा मसुदा चर्चेसाठी ठेवण्यात आला होता. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रविशंकर मोर, तर मुख्य अतिथी म्हणून नगरसेविका डॉ. परिणिता फुके, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य वामन तुर्के उपस्थित होते. संसदीय सभापती म्हणून महाराष्ट्र नॅशनल लॉ विद्यापीठाचे डॉ. विजयप्रताप तिवारी यांनी जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाचे परीक्षण वामन तुर्के, डॉ. प्रवीणा खोब्रागडे आणि माया

## नागपूर विद्यापीठाचा पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवारी

१७५ पुरस्कार जाहीर : लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या हस्ते होणार वितरण

हे आहेत गुणवंत विद्यार्थी

**नवभारत**

## विवि की स्विमिंग टीम घोषित

नागपुर, खेल प्रतिनिधि. एसआरएम इंस्टीट्यूट ऑफ साइंस एंड टेक्नोलॉजी, कट्टनकुलथुर, चेन्नई के तत्वावधान में 2 से 4 फरवरी तक होने वाली ऑल इंडिया इंटर-जोनल अंतर विश्वविद्यालय तैराकी प्रतियोगिता के लिए नागपुर विश्वविद्यालय के क्रीड़ा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी ने हाल ही में विवि की पुरुष और महिला टीम की घोषणा की. कुछ दिन पहले आयोजित पश्चिम विभागीय अंतर- विश्वविद्यालय तैराकी प्रतियोगिता में शानदार प्रदर्शन करने वाले तैराकों को राष्ट्रीय टूर्नामेंट के लिए विवि की टीम में शामिल किया गया है.



■ **विवि की टीम- महिला** : स्नेहल जोशी (गवर्नमेंट इंजीनियरिंग कॉलेज), संजना जोशी (एलएडी कॉलेज), रिद्धि परमार (डॉ. आम्बेडकर कॉलेज), अक्षता झाडे (जीएच रायसोनी इंजीनियरिंग कॉलेज). ■ **पुरुष** : यश गुल्हाने (जीएच रायसोनी इंजीनियरिंग कॉलेज), साहिल तराले (बीडी कॉलेज वर्धा), ध्रुव मिश्रा (डॉ. आम्बेडकर इंस्टीट्यूट ऑफ मैनेजमेंट), तुषार परमार (डीएन कॉलेज), सन्मय रूहीकर (एसबी जैन मैनेजमेंट इंस्टीट्यूट नागपुर). **कोच**- अमोल रायपुरकर, लोकेश गभने. ■ **मैनेजर**- तृप्ति जोध, अथर्व भोसले.

## सामूहिक प्रयासों से विकसित राष्ट्र बनेगा भारत : मंजीत कुमार

नागपुर विद्यापीठ का दीक्षांत समारोह • मेधावी छात्रों को पदक एवं पुरस्कारों का वितरण

प्रणय पवार को मिले सबसे ज्यादा स्वर्ण पदक

लेफ्टिनेंट जनरल के हाथों कर्नल का सम्मान

101 छात्रों को 142 स्वर्ण पदक

नहीं आ पाए सेनाध्यक्ष और कुलगुरु

**देशोन्नती**

## विद्यार्थ्यांनो समाज आणि राष्ट्रासाठी योगदान द्या

» लेफ्ट. जनरल चीफ ऑफ स्टाफ सदर्न कमांड मनजीत कुमार यांचे प्रतिपादन
» राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पदके व पारितोषिक वितरण सोहळा

१०१ प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके

**TheHitavada** — CITYLINE

## 'Nation rises with perseverance, sacrifice, hard work of youth'

Lt Gen Manjit Kumar, in his address to students at RTMNU convocation, stresses on aligning research and innovation with nation's needs

RTMNU CONVOCATION THE MEDAL WINNERS

**TODAY** नागपूर, शनिवार, ३ फेब्रुवारी, २०२४ — **सकाळ**

## यशासाठी जीवनात चतुःसूत्री स्वीकारा

ले. जनरल मनजित कुमार : विद्यापीठाच्या पारितोषिक वितरण सोहळा थाटात

१०१ विद्यार्थ्यांचा सन्मान

लेफ्टनंट जनरल यांच्या हस्ते कर्नलचा सन्मान

**तरुण भारत** — आपलं नागपूर

## दीक्षान्त सोहळ्यात १४५ विद्यार्थ्यांना १८९ शताब्दी सुवर्णपदके

**तरुण भारत**

## आव्हाने यशाचा टप्पा म्हणून स्वीकारा

## Bib collection expo well received

Dignitaries open expo; selfie points attract Nagpur runners on the eve of marathon

**नवभारत**



## विवि टीम की विजयी शुरुआत

■ नागपुर, खेल प्रतिनिधि. लोनेरे स्थित डॉ. बाबासाहेब आम्बेडकर प्रौद्योगिकी विश्वविद्यालय की मेजबानी में जारी राज्य अंतर-विश्वविद्यालय क्रीड़ा महोत्सव के फुटबॉल टूर्नामेंट में नागपुर विवि की पुरुष और महिला टीमों ने पहले मैच में अपने विरोधियों को हराकर विजयी शुरुआत की. शनिवार को नागपुर विवि की महिला टीम ने औरंगाबाद विवि को 4-0 से हराया. स्नेहा उइके ने 2 गोल किए जबकि श्रुति कोलते और अश्विनी भालधरे ने 1-1 गोल कर टीम की जीत में अपना योगदान दिया. वहीं पुरुषों में नागपुर विवि ने महाराष्ट्र यूनिवर्सिटी ऑफ हेल्थ साइंस नाशिक पर 3-0 से जीत दर्ज की. विजेता टीम के लिए बादल सोरेन ने 2 गोल किए जबकि गौरव सायरे ने 1 गोल दागा. विवि के क्रीड़ा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी ने टूर्नामेंट में विजयी शुरुआत करने वाली पुरुष और महिला फुटबॉल टीमों के प्रदर्शन पर संतोष व्यक्त किया.

**राज्य अंतर-विवि क्रीड़ा महोत्सव : फुटबॉल टूर्नामेंट**

Nagpur Edition
04-february-2024 Page No. 5
epaper.enavabharat.com



## विद्यापीठाच्या जलतरण संघाची घोषणा

**नागपूर** : कत्तनकुलथुर येथील एसआरएम इन्स्टिट्युट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी यांच्या अधिपत्याखाली होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष व महिला जलतरण संघाची घोषणा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी अलिकडेच केली. काही दिवसांपूर्वी झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेत दमदार कामगिरी करीत विद्यापीठाच्या जलतरणपटूंनी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. विद्यापीठ संघ : स्नेहल जोशी (शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय), संजना जोशी (एलएडी कॉलेज), रिद्धी परमार (डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज), अक्षता झाडे (जीएच रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय). पुरुष संघ : यश गुल्हाणे (जीएच रायसोनी अभियांत्रिकी कॉलेज), साहिल तराळे (बी. डी. कॉलेज, वर्धा), ध्रुव मिश्रा (डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट), तुषार परमार (डी. एन. कॉलेज), सन्मय रुहीकर (एस. बी. जैन मॅनेजमेंट इन्स्टिट्युट, नागपूर). प्रशिक्षक : अमोल रायपूरकर, लोकेश गभणे; व्यवस्थापक : तृप्ती जोध, अथर्व भोसले.

**पुण्यनगरी**

## नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांना वास्तविक जग समजण्यास मदत करेल : डॉ. सुभाष चौधरी

जे. एम. पटेल महाविद्यालयात एनईपीवर प्राचार्यांची बैठक

पुण्य नगरी / प्रतिनिधी

Smart Nagpur Edition
Feb 4, 2024 Page No. 02

**तरुण भारत** | Apla Nagpur | 2024-02-04 | Page-5
epaper.tarunbharat.net

## नागपूर विद्यापीठ संघाची विजयी सुरुवात

राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव



Powered by iDocuments

तरुण भारत
Apla Nagpur | 2024-02-06 | Page- 5
epaper.tarunbharat.net

आपलं नागपूर

## रातुम नागपूर विद्यापीठ संघांची विजयी घोडदौड



देशोन्नती

## 'टमरेल'ने पटकावला सिनेस्टोरी पुरस्कार

विद्यापीठाच्या पदव्युत्तर जनसंवाद विभागाचे आयोजन



## संशोधनासाठी मिळणार माहिती

जनगणना संचलन संचालनालयाचा विद्यापीठासोबत सामंजस्य करार



पुण्य नगरी

## महिला जन्मजात नेत्या असतात : डॉ. सुभाष चौधरी





## 'कलेच्या कौशल्यातून स्वतःची ओळख निर्माण करा'

नागपूर : 'प्रत्येकामध्ये वेगळी अंगभूत कला असते. या कलेच्या कौशल्यातून स्वतःची ओळख निर्माण करण्याचे आवाहन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यार्थ्यांना केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागात वार्षिक स्नेहमिलन सोहळा झाला. त्याचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. चौधरी बोलत होते. व्यासपीठावर रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. एन. एन. यांना करडे, समन्वयक डॉ. आर. एस. डोंगरे, केमिकल सोसायटी अध्यक्ष चैतन्य गाडेकर, उपाध्यक्ष पृथा देवईकर उपस्थित होते. स्वागतपर भाषणात डॉ. आर. एस. डोंगरे यांनी विभागातील विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रास्ताविकात विभागप्रमुख डॉ. एन. एन. करडे यांनी विद्यार्थी सांस्कृतिक-क्रीडा कलागुणांचे सादरीकरण या स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून करतात, असे सांगितले. स्नेहसंमेलन उद्घाटन कार्यक्रमात गायक धनश्री व भाग्यश्री वाटकर भगिनींचा कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तरुण भारत
Apla Nagpur | 2024-02-07 | Page- 2
epaper.tarunbharat.net

## खेळांमधूनच व्यक्तिमत्त्व विकास शक्य



डॉ. शरद सूर्यवंशी यांचे प्रतिपादन

## विद्यापीठाच्या पदव्युत्तर जनसंवाद विभागाचे आयोजनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

गुड न्यूज बाय अँथनी - टमरेलने पटकावला सिनेस्टोरी पुरस्कार



देशोन्नती

## संशोधनासाठी उपलब्ध होणार जनगणनेची माहिती



जनगणना संचलन संचालनालयाचा विद्यापीठासोबत सामंजस्य करार

पुण्य नगरी

## संशोधनासाठी उपलब्ध होणार जनगणनेची माहिती

जनगणना संचलन संचालनालयाचा विद्यापीठासोबत सामंजस्य करार

पुण्य नगरी / प्रतिनिधी



नागपूर : विद्यार्थी, शिक्षकांना संशोधनासाठी जनगणनेची माहिती आता उपलब्ध होणार आहे. याकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने जनगणना संचलन संचालनालय यांच्यासोबत सामंजस्य करार केला आहे. सामंजस्य करार हस्तांतरण सोहळा विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभा कक्षात मंगळवारी पार पडला. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व जनगणना संचलन संचालनालयाच्या संचालक डॉ. निरुपमा डांगे यांनी सामंजस्य करार हस्तांतरित केला.

यावेळी डॉ. चौधरी, डॉ. संजय दुधे, डॉ. राजू हिवसे, डॉ. निरुपमा डांगे, डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. संजय कवीश्वर, डॉ. श्यामराव कोरेटी, डॉ. प्रशांत कडू, डॉ. राजेश सिंह, डॉ. विकास जांभुळकर, डॉ. अशोक बोरकर, डॉ. सत्यप्रिय इंदुरवाडे, ए. एन. राजू, व्ही. एफ. अहिरे, वाय. एस. पाटील, किरण गुरव व प्रवीण भगत यांची उपस्थिती होती. विद्यापीठाच्या महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसरातील सांख्यिकी विभागात जनगणना डेटा संशोधन कार्य केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे उद्घाटन डॉ. संजय दुधे व डॉ. निरुपमा डांगे यांच्या हस्ते झाले.

प्रास्ताविक डॉ. राजेश सिंह यांनी केले. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी जनगणनेसंबंधी संशोधन करणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांना विद्यापीठातील जनगणना डेटा संशोधन कार्य केंद्राचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. आभार डॉ. सत्यप्रिय इंदुरवाडे यांनी मानले.

**१८८१ पासून प्रत्येक १० वर्षानंतर जनगणना**

जनगणना संचलन संचालनालयाचे डेप्युटी रजिस्टर जनरल ए.एन. राजू यांनी पावर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे जनगणनाबाबत सादरीकरण केले. ते म्हणाले, भारतात १८७२ पासून जनगणनेस प्रारंभ झाला. १८८१ पासून प्रत्येक १० वर्षानंतर जनगणना केली जात आहे. जनगणनेसंबंधी १९४८ मधील कायद्याचे कलम १५ नुसार वैयक्तिक माहिती उघड करता येत नसल्याची माहिती त्यांनी दिली.

Smart Nagpur Edition
Feb 7, 2024 Page No. 02
Powered by : eReleGo.com



## 'गुड न्यूज बाय अँथनी', 'टमरेल'ने पटकावला पुरस्कार

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर जनसंवाद विभागातर्फे आयोजित सिनेस्टोरी स्पर्धेचा पुरस्कार वितरण समारंभ नुकताच झाला. या स्पर्धेत नागरिक गटात संत्रा बर्फी टीमचा 'टमरेल' तर विद्यार्थी गटात डब्बा टीमच्या 'गुड न्यूज बाय अँथनी' लघुपटाने सिनेस्टोरी पुरस्कार पटकावला. कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी तसेच प्रमुख अतिथी म्हणून दिग्दर्शक तृषांत इंगळे, विभागप्रमुख डॉ. मोईज मन्नान हक, परीक्षक अनुराग कुलकर्णी, पुरस्काराचे प्रायोजक ऑटो ट्रेडच्या रूपल अनासाने यांची उपस्थिती होती. सिनेस्टोरी स्पर्धेचे परीक्षण पत्रकार प्रदीप मैत्र, आदित्य शर्मा व अनुराग कुलकर्णी यांनी केले. नागरिक गटात प्रथम पुरस्कार 'संत्रा बर्फी', द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार 'घाणेरडा', तृतीय क्रमांकाचा पुरस्कार 'ब्रिथ ४०४' यांना प्रदान करण्यात आला. विद्यार्थी गटात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार 'डब्बा' (गुड न्यूज बाय अँथनी), द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार 'प्रारंभ' यांना प्रदान करण्यात आला. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. मोईज मन्नान हक, सूत्रसंचालन सोनू शर्मा यांनी केले. पुरस्कार वितरणाचे संचालन प्रिया जैस यांनी केले. आभार प्रतीक्षा वासनिक या विद्यार्थिनीने मानले.

## ज्ञानासह अनुभवातून प्रावीण्य मिळेल : सुभाष चौधरी

शासकीय तंत्रनिकेतनचा पदविका प्रदान सोहळा थाटात संपन्न



पुण्य नगरी

## मोडी लिपीची ओळख झाल्यास वाचक निर्माण होईल



लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

## परीक्षेतील गुणांवरून यशाचे मूल्यांकन नाही



पुण्य नगरी

## विद्यापीठाच्या स्नेहसंमेलनातून कलागुणांची उधळण



पुण्य नगरी

## तंत्रनिकेतनच्या पदविका समारंभात अविना डांगे यांना ८ सुवर्णपदक



LOKMAT TIMES

## Learn to accept challenges: VC Dr Chaudhari

615 students awarded diplomas in 26th Govt Poly convocation

Lokmat News Network
NAGPUR



(Left) A student of diploma in information technology department and topper Avina Dange being presented an award by vice-chancellor of RTMNU Dr Subhash Chaudhari during 26th convocation of Government Polytechnic on Friday. (Middle) Other toppers Shivam Patle and Isha Khutaphale along with their prizes.

Addressing the 26th convocation function at the Government Polytechnic, Vice Chancellor Dr. Subhash Chaudhari said that in the high tech world every information is available on the tip of your finger. However, the lessons learned from overcoming challenges are unparalleled. Therefore, face every challenge to learn the lessons of life.

Dr Chaudhari, who was the ... tary of the Regulatory Board Dr. Manoj Kumar Diagwane ... torious students receiving gold medals, silver medals, prizes ... cash awards. Notably, ...a Sanjay Dange excelled ...e Diploma in Information ...nology programme, se...ng 97.90 percent marks ... winning eight awards, in...ing a gold medal.

...ther outstanding ...evers, such as Isha Khutaphale (97.5%) and Shivam Patle, were also recognised for their accomplishments.

During the event, Dr Chaudhari also discussed the evolving landscape of technology and its impact on professions. He mentioned the rise of artificial intelligence and emphasised the importance of intellectual capabilities in a future where human trainers may be replaced by mobile-accessible information.

Dr Ram Kshirsagar and Dr Dattatraya Jadhav provided guidance to the students, while Dr. Manoj Kumar Diagwane highlighted the achievements of the Government Technical Institute throughout the year.

## नागपुर विवि की वुशु टीम घोषित



भास्कर खेल | नागपुर. जम्मू विश्वविद्यालय के तत्वावधान में 13 से 17 फरवरी तक जम्मू में आयोजित होने वाले अखिल भारतीय अंतर-विश्वविद्यालय वुशू टूर्नामेंट के लिए ... अश्लेषा वर्मा, अचल खातदेव। **भार वर्ग :** शिल्पा गायधने, रोहित थोराट, तनुश्री वासनिक, साक्षी मोहिते, मनिका परिहार, सोनाली भोयर, कीर्ति कुमरे।

नवभारत



## विवि की वुशु टीम घोषित

■ नागपुर, खेल प्रतिनिधि. जम्मू विश्वविद्यालय के तत्वावधान में 13 से 17 फरवरी तक जम्मू में ऑल इंडिया इंटर-यूनिवर्सिटी वुशु टूर्नामेंट का आयोजन किया जा रहा है. इसके लिए नागपुर विवि के क्रीड़ा संचालक ने विवि की की पुरुष और महिला टीम की घोषणा की. ... गायधने, रोहित थोराट, तनुश्री वासनिक, साक्षी मोहिते, मनिका परिहार, सोनाली भोयर, कीर्ति कुमरे. **पुरुष :** अल्पेश बावनकर, रोहित थोराट, तेजस पालकर, यश कांबले, अभिषेक सोनवने, कोमल बारापात्रे. **भार वर्ग :** दर्शन येरपुडे, आर्यन यादव, संदेश गोरे, रवि सिंह, मोहित यादव, श्रेयल रंखम, आयुष निखारे, हर्षित, राहिल शर्मा, आर्यन शर्मा, अक्षय गवई. **प्रशिक्षक-** प्रफुल गजभिये, सौरभ बोरकर. **व्यवस्थापक-** मेघा निमजे.

LOKMAT TIMES

## NU registrar Hiwase meets students, assures to address their grievances

Litty Tomson
NAGPUR



RTMNU registrar Raju Hiwase interacting with the students during his visit to the hostel.

In the wake of protest by the students residing in the boys hostel of Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University (RTMNU) late on Monday night, the university registrar Raju Hiwase paid a visit to the hostel Tuesday at noon and discussed the issues with students. He assured them that he would take immediate action to resolve the issue, and that funds were available and would be allocated appropriately without delay.

The students had on Monday night staged a protest at the university against the hostel's poor maintenance and lack of basic amenities. They had gathered in large numbers and raised slogans demanding immediate action from the university authorities.

They demonstrated inside the university till 3:30 a.m. Despite the late hour, the students remained determined to make their voices heard and continue their protest until their demands were met.

In addition to the hostel's filthy and unsanitary conditions, the students complained to the registrar about problems they had with the tiffin services provided by the hostel authorities, as the quality of the food served was so poor that they were forced to eat outside.

In an attem... about this m... Times called ... den, Hitesh ... but he did not



## प्राणिशास्त्र विभागात मौखिक सादरीकरण स्पर्धा

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने आंतरविद्यापीठ मौखिक सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'वन्यजीव संरक्षण' या संकल्पनेवर ही स्पर्धा आधारलेली होती. प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. टी. धुर्वे या प्रमुख संयोजक तर डॉ. एस. सी. मसराम आयोजन सचिव होते. डॉ. ए. एम.नागवंशी, डॉ. एम. टी. ठाकरे, डॉ. यु. ए. जीवनतारे, पवन ... शहारे, अंकिता शर्मा आणि धरिता जोशी समन्वयक ...घाटन कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते करण्यात ...संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगेबाबा ...गोंडवाना विद्यापीठ अशा विविध विद्यापीठे आणि स्वायत्त ...कूण २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि दोन तांत्रिक

## यवतमाळातील पाचखेडमध्ये होणार उत्खनन

विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्व विभागाला बहुमान



देशोन्नती वृत्तसंकलन...

नागपूर ■ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्व विभागाने यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यात असलेल्या पाचखेड येथील पुरातत्त्व स्थळावर उत्खनन सुरू केले आहे. विभागाने प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या शुभहस्ते उद्घाटन करून ११ फेब्रुवारी रोजी उत्खननास सुरुवात केली आहे.

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण महासंचालक यांच्याकडून पाचखेड येथे उत्खनन करण्यासाठी विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्व विभागाला परवाना प्राप्त झाला आहे. विभागप्रमुख डॉ. प्रभास साहू यांच्या मार्गदर्शनाखाली हे उत्खनन केले जाणार आहे तर डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे हे सहसंचालक आहेत.

पाचखेड हे महाराष्ट्राच्या यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्याच्या महसुली कार्यक्षेत्रात येणाऱ्या चंद्रभागा आणि वर्धा या दोन नद्यांच्या संगमापासून सुमारे १ किमी दक्षिण-पूर्वेस चंद्रभागा नदीच्या डाव्या तीरावर वसलेले आहे. फुलगाव-बाबुळगाव रस्त्यावर सिंधी गावाच्या पूर्वेस ३ किमी आणि यवतमाळ शहरापासून ४३ किमी अंतरावर हे गाव आहे. या वस्तीच्या पुरास्थळीला स्थानिक पातळीवर 'सासू-सुनेचे उखाडे' आणि 'बरड' म्हणून ओळखले जाते.

या ठिकाणी उत्खननाचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या शुभहस्ते ११ फेब्रुवारी रोजी करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी, पाचखेडच्या सरपंच कल्पना वानखेडे, पोलिस पाटील धनश्री देशमुख, माजी सरपंच देशमुख, शिक्षक दिनेश पसारे यांची उपस्थिती होती. यावेळी विभागातील डॉ. एकता धारकर, डॉ. मोहन पारधी, डॉ. अमरदीप बारसागडे, डॉ. के. एस. चंद्रा, बिपिन बनसोड, चेतना वढावे, संशोधक तन्मय हवलदार, निहा रिछारिया, सुशांत बेगडे, मनीषा पिल्लारे, गजानन मेश्राम, राजेश शिरसुदे यांच्यासह एमए १ व २ मधील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

**उत्खननाची वैशिष्ट्ये**

यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी (१९७१ व १९८४) येथील उत्खननातून मिळालेल्या सांस्कृतिक अनुक्रमांची तुलना करणे. नागपूर जिल्ह्यातील आदमशी असलेली आत्मीयता तपासणे. पश्चिम व पूर्व विदर्भातील लोहयुगीन समाजाची संलग्नता पाहणे. भोकरदन ते पवनी यांना जोडणाऱ्या सातवाहन काळातील व्यापारी मार्गावर असल्याने स्थळांचे महत्त्व तपासणे. मानवी विध्वंसामुळे पुरातत्वीय खुणा पूर्णपणे नष्ट होण्याच्या मार्गावर आहे आणि म्हणूनच त्याची पुनर्प्राप्ती होणे आवश्यक आहे. एम ए भाग १ व २ च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमाचा भाग म्हणून प्रशिक्षण देण्यासाठी हे उत्खनन केले जात आहे.

## सातवाहनकालीन व्यापारी स्थळांचे उत्खनन

म.टा.प्रतिनिधी, नागपूर



उत्खननस्थळी उपस्थित प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, अधिष्ठाता डॉ. शाम कोरेटी.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्व विभागाने यवतमाळ ...

■ नागपूर विद्यापीठाचा पुढाकार, यवतमाळ जिल्ह्यातील पाचखेड येथे काम सुरू

**वैशिष्ट्ये**

यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी येथे १९७१ व १९८४ झालेल्या ...

पुण्य नगरी

## नागपूर विद्यापीठाचे यवतमाळ जिल्ह्यातील पाचखेड येथे उत्खनन



Nagpur Edition
Feb 15, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

तरुण भारत
Apla Nagpur | 2024-02-16 | Page- 3
epaper.tarunbharat.net

## विद्यापीठात सेवालाल महाराज जयंती



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात संत सेवालाल महाराज जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे सहायक कुलसचिव गणेश कुमकुमवार यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मोरेश्वर उमरेडकर, नरेंद्र पवार, कार्तिक हरडे, शीतल शेटे, प्रकाश कुंजाम यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

Powered by iDocuments



तरुण भारत
Apla Nagpur | 2024-02-17 | Page- 3
epaper.tarunbharat.net

## शिक्षकांना कृतिशील, प्रायोगिक शिक्षणाचे धडे

**महाराष्ट्र राज्य विद्या शाखा विकास अकादमीची कार्यशाळा**



कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मान्यवर, सोबत सहभागी

◆ नागपूर, १६ फेब्रुवारी

महाराष्ट्र राज्य विद्या शाखा विकास अकादमीच्या (एमएसएफडीए) वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शिक्षकांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना कृतिशील तसेच प्रायोगिक शिक्षण देता यावे म्हणून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यापीठाच्या गणित विभागातील श्रीनिवास रामानुजन सभागृहात ही कार्यशाळा पार पडली. याप्रसंगी एमएसएफडीएचे कार्यकारी संचालक डॉ. निपुण विनायक, गाजियाबाद येथील नॉलेज लिंकचे निशीत कुमार, मुंबई विद्यापीठातील एमएसएफडीएच्या सदस्य डॉ. सिबिल थॉमस, विद्यापीठाच्या आयक्यूएसी समन्वयक डॉ. स्मिता आचार्य यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी सहभागी शिक्षक तसेच प्रतिनिधींसोबत उच्च शिक्षणामध्ये होत असलेल्या विविध बदलांबाबत चर्चा करण्यात आली. शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधींचे अनुभव कथानकाच्या स्वरूपात घेण्यात आले. चार्ट पेपर तयार करणे, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे सादरीकरण, समूह प्रेझेंटेशन, त्याचप्रमाणे समूह चर्चा असे विविध उपक्रम राबविण्यात आले. प्रायोगिक शिक्षण, सर्जनशीलता आणि नवीनता, ज्ञानाच्या पलीकडे शिकणे, बहुविद्याशाखीय शिक्षण, विविधता आणि समावेश तसेच वैज्ञानिक स्वभाव आणि तर्कशुद्ध विचार या विषयावर माहितीचे आदान-प्रदान झाले.

(तभा वृत्तसेवा)

**विभाग स्तरावर कार्यशाळा**

एमएसएफडीएतर्फे एक दिवसीय प्रादेशिक कार्यशाळांची मालिका ...

## नागपुर विवि के हर्षित को गोल्ड मेडल



भास्कर खेल | नागपुर. राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के हर्षित ने जम्मू विश्वविद्यालय की मेजबानी में चल रहे अखिल भारतीय अंतर विश्वविद्यालय वुशु टूर्नामेंट में स्वर्ण पदक जीता। पुरुषों के 75 किलोग्राम भार वर्ग के सांडा फाइट में हर्षित ने स्वर्ण प्रथम स्थान हासिल किया। ज्योतिबा कॉलेज ऑफ फिजिकल एजुकेशन के छात्र हर्षित ने व्यक्तिगत वर्ग में मेजबान जम्मू यूनिवर्सिटी के रत्नशिव राणा को 8-2 यानी 6 अंकों से हरा दिया। हर्षित के प्रदर्शन के बारे में नागपुर यूनिवर्सिटी के खेल निदेशक डॉ. शरद सूर्यवंशी ने खुशी जाहिर की है। नागपुर विश्वविद्यालय के कुलपति डॉ. सुभाष चौधरी, प्र कुलपति डॉ. संजय दुधे, रजिस्ट्रार डॉ. राजू हिवसे ने हर्षित को बधाई और भविष्य के लिए शुभकामनाएं दीं।

## लोककल्याणकारी राज्याची संकल्पना संपूर्ण जगासाठी आदर्श



आधार घेत सर्वसामान्य जनतेच्या गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांना हिंदवी स्वराज्य स्थापन करावे लागले, असे डॉ. पांडव यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे राज्य लोककल्याणकारी सुराज्य कसे निर्माण झाले याचा त्यांनी विविध पत्र तसेच समकालीन साहित्याचे दाखले देत उलगडा केला. आश्रयाला आले त्याचे कल्याण हाच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सुराज्याचा मध्यबिंदू होता, असे ते म्हणाले. वयाच्या ९ व्या वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याणकारी मुद्रा घेतली ती कायम ठेवली. ३५० वर्ष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याला झाली आहेत. जगभरातील कल्याणकारी राज्याला छत्रपती शिवाजी महाराज आदर्श वाटतात, याचा खोलवर जाऊन अभ्यास करण्याची आवश्यकता डॉ. पांडव यांनी व्यक्त केली.

यावेळी अध्यक्षीय भाषण करताना डॉ. सुभाष चौधरी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे अनेक पैलू संशोधनातून उघड होतील, असे सांगितले. समाजाच्या गरजा लक्षात घेत स्थानिक पातळीवर संशोधन करीत त्याला जागतिक पातळीवर न्यावे. त्याचप्रमाणे शताब्दी वर्षानिमित्त विद्यापीठाने सुरू केलेल्या 'रिचिंग टु अनरीच' अभियानाबाबत माहिती दिली. संशोधनासाठी विद्यापीठाच्या रुसा केंद्राला भारत सरकारकडून २० कोटी रुपयांचा निधी मिळाल्याचे कुलगुरूंनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले.

## छत्रपतींची लोककल्याणकारी राज्याची संकल्पना जगासाठी आदर्श

**डॉ. रमेश पांडव : नागपूर विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त व्याख्यान**



तरुण भारत
Apla Nagpur | 2024-02-20 | Page- 4
epaper.tarunbharat.net

सोनटक्के उपस्थित होते.

### ज्ञानस्त्रोत केंद्र



राष्ट्र संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रामदासपेठ ज्ञानस्रोत केंद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. विजय खंडाळ यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी सहायक ग्रंथपाल डॉ. पूजा दाढे यांच्यासह कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्यापीठ खेळाडूंनी ऑलिम्पिककडे लक्ष ठेव[ावे]

**प्र-कुलगुरू डॉ. संजय [दुधे यांचे प्र]तिपादन**

...[खेळाडूंना सर्व सुविधा देण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ सदैव तत्पर आहे. विद्यापीठाने दिलेल्या सुविधांचा पुरेपूर लाभ खेळाडूंनी घ्यावा. तसेच ऑलिम्पिकमध्ये सहभागी होण्याचे लक्ष्य सर्व खेळाडूंनी ठेवावे, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-]कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले.



खेलो इंडिया विद्यापीठ गेम्ससाठी जाणाऱ्या विद्यापीठ संघास ध्वज प्रदान करण्याचा सोहळा रवि नगरातील क्रीडा परिसरात नुकताच पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. धनंजय वेळुकर, अरुणराव कलोडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन जंगीटवार, विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. संजय चौधरी, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ. दुधे म्हणाले, खेळाडूंनी आत्म... जिद्द, चिकाटी आणि... निर्णयाच्या जोरावर स्पर्धेत कुठल्याही प्रकारचा तणाव... स्पर्धेत पदक मिळवित पाल... विद्यापीठाचे नाव मोठे क... मार्गदर्शन प्र-कुलगुरू दु... केले. प्रास्ताविक डॉ. शरद... यांनी केले. संचालन... कोट्टेवार तर आभार प्रा... विवेकानंद सिंग यांनी मा...

**३९ खेळाडूंचा सह...**

याप्रसंगी डॉ. दुधे यां... विद्यापीठ संघाचे कर्णधार... चुटे आणि यश गुल्हाने य... वितरण करण्यात आले. वि... खेळाडू योगासन, ॲथ... फेन्सिंग, टेबल टेनिस, ... कुस्ती या क्रीडा प्रकारात ... खेळाडू सहभागी होणार ...

## शिवाजी महाराज की लोककल्याणकारी राज्य की संकल्पना विश्व के लिए आदर्श



**नागपुर :** छत्रपति शिवाजी महाराज की कल्याणकारी राज्य की संकल्पना पूरी दुनिया के लिए एक आदर्श है. यह बातें डॉ. बाबासाहब आंबेडकर मराठवाड़ा विश्वविद्यालय संभाजीनगर, जीएमएनआईआरडी के पूर्व संचालक डॉ. रमेश माधवराव पांडव ने कही. वे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के जमनालाल बजाज प्रशासनिक भवन के सभागार में सोमवार को छत्रपति शिवाजी महाराज की 394वीं जयंती पर आयोजित व्याख्यान को संबोधित कर रहे थे. कार्यक्रम की अध्यक्षता विश्वविद्यालय के कुलपति डॉ. सुभाष चौधरी ने कही.

इस अवसर पर प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे उपस्थित थे. डॉ. पांडव ने बताया कि छत्रपति शिवाजी महाराज के समकालीन इस्लामी राज्य में लोगों की भोजन, वस्त्र, आवास आदि आवश्यकताएं पूरी नहीं होती थीं. ऐसे में छत्रपति शिवाजी महाराज को आम लोगों की जरूरतों को पूरा करने के लिए हिंदू स्वराज की स्थापना करनी पड़ी. उन्होंने विभिन्न पत्रों और समसामयिक साहित्य का हवाला देकर बताया कि कैसे छत्रपति शिवाजी महाराज का राज्य लोक कल्याणकारी राज्य बन गया. छत्रपति शिवाजी महाराज के शासनकाल का केंद्र बिंदु शरण में आए लोगों का कल्याण था. कार्यक्रम का संचालन डॉ. अमृता इंदुरकर ने किया. आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे ने माना.

पुण्य नगरी

## अनुभवात्मक शिक्षणाबाबत विद्यापीठात कार्यशाळा



**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात केस स्टडीवर आधारित अनुभवात्मक शिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. विद्यापीठाचा पदव्युत्तर गांधी विचारधारा विभाग, महाराष्ट्र राज्य विद्या शाखा विकास अकादमी व आयआयटी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाच्या पदव्युत्तर गांधी विचारधारा विभाग येथे संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी दोन तुकड्यांमध्ये चार दिवसांची ... 'राष्ट्रीय शैक्षणि[क] ...

अंमलबजावणीसाठी पुढाकार म्हणून डॉ. प्रशांत कडू यांनी ही कार्यशाळा आयोजित केली होती. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले. पहिल्या ...

तुकडीने ओलेघाट व कोलितमारा या गावांना भेट दिली. प्रत्येकाने तयार केलेला अहवाल डॉ. गोपाल चव्हाण यांच्याकडे सादर करण्यात आला. यशस्वितेसाठी प्रा. प्रमोद ...

## पीएम-उषा अंतर्गत विद्यापीठाला २० कोटी रुपयांचे अनुदान

**▶▶ प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने शुभारंभ**

देशोन्नती वृत्तसंकलन...



